

# माणूस



निवडणुकीचा संग्राम सुरू झाला आहे.
स्वतःचे विचार बोलून दाखवले पाहिजे
लिहिले पाहिजेत.
कितीही सामान्य माणूस असला तरी
त्याने यावेळी जागे राहिले पाहिजे.

—श्री. ज. जोशी

शनिवार
२ जानेवारी १९७१
चाळीस पैसे

## माझा जाहीरनामा

शनिवार, २ जानेवारी १९७१

माणूस

: सहावे९हावे | संपादक | सहाय्यक
: एकूणपन्नासावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर
| | सौ. निर्मला पुरंदरे

त | वार्षिक वर्गणी | परदेशाची वर्गणी
ोस पैसे | तीस रुपये | साठ रुपये

## प्रेम नमस्कार..

▫ श्रीकान्त आंबेकर यांचा दूरचे तारे हा लेख वाचला. माहितीपूर्ण आहे. पण एखादे विज्ञानाचे पुस्तक वाचीत आहे असे वाटले. माणूसचे लिखाण वैचारिक असावे हे कबूल. पण म्हणून 'माणूस' क्लिष्ट व्हावा असे नाही. 'विज्ञानेश्वरी' (दत्तप्रसाद दाभोळकर) किंवा विजय वैद्य यांचे लेख खासच माहितीपूर्ण व सुबोध असतात. अवकाशयाने वगैरे माहिती एखाद्या Science-Journal मध्ये मिळू शकते. माणूसमध्ये भिंतीच्या तुंबड्या, वाहते वारे व ग्यानबाचे खुसखुशीत लिखाण असावे ही अपेक्षा.

**१०।१२।१९७०** **म. दा. दामले**, खेड

ाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

ात लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' ाहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# पहिले पाऊल

निवडणुकांचे महत्त्व ओळखणारा पण या चढाओढीत, गदारोळात व्यवसाय व प्रवृत्तीवैशिष्टये यामुळे सहसा भाग न घेणारा असा फार मोठा वर्ग कुठल्याही लोकशाही देशात अस्तित्वात असतोच.

प्रचारयुद्धात तो आघाडीवर राहू शकत नाही. परंतु विचारयुद्धात त्याने मागे राहता कामा नये. अलिप्त असला तरी तो उदासीन नसावा. अलिप्त पण अनुदासीन अशा या वर्गाचे महत्त्व गुणात्मकदृष्टया अनन्य-साधारण आहे, लोकमत तयार करण्याच्या कामी या वर्गाला खूप कामगिरी बजावता येणे शक्य आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत या वर्गाला आपले विचारदर्शनाचे नियत कर्तव्य पार पाडण्यास मदत व्हावी यासाठी 'माणूस'ने हा नवा स्तंभ याच अंकापासून सुरू केला आहे.

शिक्षक, लेखक, कलावंत, कारागीर, शेतकरी, सैन्याधिकारी, कारखानदार—व्यापारी, विद्यार्थी—कामगार—विविध क्षेत्रातील व विविध थरातील सुजाण व्यक्तींनी या स्तंभातून आपले विचार जनतेसमोर मोकळेपणाने ठेवावेत अशी यामागील मुख्य कल्पना आहे.

पुढाऱ्यांनी, नेत्यांनी सांगायचे आणि लोकांनी ऐकत राहायचे ही 'एकेरी वाहतूक' लोकशाहीला अभिप्रेत नसते. लोकांनीही पुढे सरसावून आपल्याला काय हवे—नको हे सांगितले पाहिजे, आपले विचार, आपल्या व्यथा, राज्यकर्त्यांसमोर धीटपणे मांडल्या पाहिजेत.

पक्षांचे जाहीरनामे आपण वाचूच. पण लोकांचे जाहीरनामेही पक्षांसमोर यायला हवेत.

यासाठी हा 'माझा जाहीरनामा'.

पक्षांचे जाहीरनामे फडकू लागण्यापूर्वीच 'माणूस'ने हा जाहीरनामा फडकावून निवडणूक क्षेत्रातील पहिले पाऊल उचलले आहे.

वाचक या उपक्रमाचे स्वागत करतील अशी आशा आहे....

# माझा जाहीरनामा...

**श्री. ज. जोशी**

रविवार दि. २७ डिसेंबर !...संध्याकाळी सहा वाजता जनसंघाचे नेते अटलबिहारी बाजपेयी यांच्या व्याख्यानाला मी आवर्जून गेलो होतो. रिक्षा सभास्थानाकडे चालली होती आणि माझे मलाच आश्चर्य वाटत होते. मी पिढ्यान् पिढ्यांचा पुणेकर. राजकीय सभासम्मेलनात रस घेणारा. शनवार वाड्यापुढची व्याख्याने सहसा न चुकविणारा. पण तोपर्यंत जनसंघाच्या एकाही व्याख्यानाला मी कधी गेलोच नव्हतो.–जावेसे वाटलेच नव्हते. माझ्या लेखी जनसंघ जातीय होता म्हणूनच अस्पृश्य होता. स्वातंत्र्यपूर्व काळात मी ज्या पुण्यात वाढलो, तिथे जातीयतेचा वाराही अंगावरून न जाऊ देण्याचा अटोकाट प्रयत्न होत होता. समाजवादी, निधर्मी आणि पुरोगामी अशी विचारसरणी तरुणांनी अंगीकारावी असा प्रयत्न तेव्हा होत होता. जनसंघापासून म्हणूनच मी लांब होतो. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की त्या दिवशी व्याख्यानाला जाण्याची उत्सुकता माझ्या मनात उत्पन्न झाली होती. टिळक रोडवरून जाताना मी आसपास पहात होतो. जिकडे तिकडे भगवे ध्वज लागलेले होते. जनसंघाचे चिन्ह असलेली निशाणे घरा घरांवर फडकत होती. पुण्याच्या सर्व बाजूंनी प्रचंड जनसमुदाय सभा स्थानाकडे रोरावत होता. मला आश्चर्य वाटत होते. त्या समुदायात फक्त मध्यम वर्गीय ब्राह्मण नव्हते. पुण्यातील पूर्व भागातील समाज तिथे बहुसंख्येने होता. अटल बिहारींचा सारखा जयघोष चालला होता. मी जुन्या काळी नेहरूंच्या एस. पी. कॉलेजवरच्या किंवा जुन्या बाजारातल्या सभा पाहिल्या होत्या. त्या सभांची आठवण होत होती.

मी आत शिरलो आणि खुर्चीकडे जात असतांना अनेक परिचित् भेटले. प्रत्येकाचा चेहरा थोडाफार अस्वस्थ होता. हलक्या आवाजात जो तो निवडणुकींविषयी कुजबुजत होता. निवडणुका होणार हे प्रत्येकजण नक्की धरून चालला होता. 'तुम्ही कुणाला मत देणार ?'...'कोणता पक्ष निवडून येईल ?'... 'पुण्यात लोकसभेला कोण उभे रहाणं शक्य आहे ?'...'सरकारी कांग्रेस किती

जागा मिळवील ?'...' जनसंघाचे चान्सेस काय आहेत ?'... अनेक प्रश्न विचारले जात होते. प्रत्येकाच्या डोळ्यात ते दिसत होते. प्रत्येकाच्या मनात खदखदत होते.

सभा संपवून घरी आलो आणि रात्री आकाशवाणीवर घोषणा झालेली ऐकली. महामंत्री इंदिरा गांधी यांनी समाजवादी धोरणास जनतेचा नव्याने कौल हवा असल्यामुळे निवडणुका घेणे अपरिहार्य आहे असे सांगितले. रेडिओचे बटण बंद करून काही वेळ अंधारातच सुन्न होऊन बसलो. माझ्या लहानपणापासून मी पुण्यात अनेक निवडणुकांची रणधुमाळी पाहिलेली आहे. कॉलेजात असताना सायकलीला झेंडे लावून उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी प्रभात फेऱ्याही काढल्या आहेत. ती सगळी दृश्ये मला पुन्हा दिसली. नेहरूंच्या प्रचंड सभा स्वप्नात अनुभवल्या. त्या त्या वेळी केलेल्या घोषणांचे आवाज कानात घुमले. ' नही रखना ! नही रखना–सरकार जालीम नही रखना...साम्राज्यशाही सरकारचा नाश होवो... शेतकरी कामकरी क्रांतीचा विजय असो...कमानेवाले खायेंगे ! ...जातीय घुबडांना हाणून पाडा...हिंदू-मुसलमान ऐक्याचा विजय असो...अस्पृश्यता नष्ट झालीच पाहिजे...इन्किलाब् झिंदाबाद'.. बापरे ! किती भयंकर ते आवाज ! त्या कोलाहलात झोप येणे शक्यच नव्हते.

रात्र तशीच सरली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी, मन काहीसं शांत झालं. वादळ संपावं–धुकं निवळावं आणि आसमंत स्वच्छ दिसायला लागावं तसं मला झालं. गेली वीस वर्षे मी निवडणुकात मतदान करीत आहे. भक्तीभावाने नेहमीच काँग्रेसला मत देत आलो आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळीच फक्त मी काँग्रेसला मत दिले नव्हते. पण त्याचीही चुटपूट लागून राहिली होती. असा जो मी, त्याने गेल्या वीस वर्षात काय मिळवलं ? आणि काय घालवलं ? तरुणपणी घोषणा दिल्या. सायकल फेऱ्या काढल्या. काही लेखन केले. अंगात तितकंसं धैर्य नव्हतं म्हणून तुरुंगवास घडला नाही. पण काही त्याग करावा असं वाटत होतं... असा जो मी; तो आज नक्की कुठे उभा आहे ? निवडणुकीचं रणांगण सजलं आहे. समोरासमोर योद्धयांची दले उभी आहेत. आता थोड्याच वेळात शंख फुंकले जाणार आणि रणभेऱ्यांच्या आवाजानं आसमंत ढवळून निघणार. पुढच्याच क्षणाला वार आणि प्रतिवार होणार आणि इतकी तुंबळ लढाई जुंपणार की शत्रू-मित्र ओळखता येणार नाहीत. अशा वेळी मी काय करायला पाहिजे ? मी कोणत्या पक्षाचा आहे ? मी कोणाला मत देणार ? माझं कोणीही ऐकणार नाही. पण तरीही एखाद्याने विचारलेच तर कुणाला मत देण्याविषयी मी सांगणार ? गेली वीस वर्षे मी आरोळ्या ठोकीत आलो आहे. घोषणांच्या लहरींवर मी माझ्या आयुष्याची नौका हाकारतो आहे. बेभान होऊन मी ओरडलो आहे. पण आज तितकी इच्छाच उरलेली नाही. मी आज शांतपणे विचार करू शकतो. गेल्या अनेक निवडणुकात मी मतदान केले. पण असा विचार कधी केला नव्हता. बालविवाहात

पति-पत्नी काहीही विचार न करता एकमेकांच्या गळ्यात माळा घालतात. माझेही मतदान तसेच होते. भारतातल्या बहुतेक सर्व मतदारांचे तसेच असते. पण माझ्यात आज तो पोरपणा राहिलेला नाही. कोणाला मत द्यायचं ? आणि का मत द्यायचं ? हा विचार माझ्या मनात भुतासारखा उभा आहे.

मत कोणत्या पक्षाला द्यायचं ? हे ठरवण्याअगोदर माझी आजची मनःस्थिती सांगायला हवी. भारताच्या एकंदर परिस्थितीविषयी माझं मन अलीकडे फार अस्वस्थ आणि चिंतातूर आहे. मी स्वतः कारकुनी करतो–दिवसाचा बहुतेक सारा वेळ कारकुनात वावरतो. कनिष्ट मध्यम वर्गातली ही सगळी मंडळी फारशी विचारवंत नसतात. राजकीय दृष्टीने जागरूक असण्याचंही त्यांना कारण नसतं. स्वतःचा दोन खोल्यातला संसार निष्कर्जीय राहून कसाबसा करावा एवढीच त्यांची माफक अपेक्षा असते. दुपारी टिफीन टाईममध्ये कारकून लोक एकत्र जमतात आणि गप्पा मारतात. त्या मी अभ्यासतो. हे अश्राप जीव अलीकडे सारखे राजकारणावरच बोलत असतात. महागाईबद्दल, अराजकाबद्दल त्या प्रत्येकाच्या मनात चिंता असते. पुण्यातल्या बसमधून मी नेहमी फिरतो. आसपासचे लोक काय बोलत असतात याकडे माझे लक्ष असते. प्रत्येकजण देशात सुरू झालेल्या यादवीबद्दल आणि अराजकाबद्दल बोलत असतो. देशातल्या सामान्य माणसांनी दैनंदिन राजकारणाबद्दल तिन्ही त्रिकाळ सारखं ओरडत असावं ही घटना माझ्या दृष्टीने अशुभ आहे.

या सामान्यातलाच मी एक. मी दररोज वर्तमानपत्र वाचतो आणि नाही म्हटलं तरी मन विषण्ण होतं. काय चाललं आहे हे मला कळतच नाही. बंगालमधल्या परिस्थितीमुळे तर अंगावर काटाच येतो. तिथे भररस्त्यावर दिवसाढवळ्या बाँब फुटतात. पोलीस अधिकाऱ्यांचे खून होतात. टागोर किंवा चित्तरंजनदास यांच्यासारख्यांचे पुतळे विद्रूप होतात. केंद्रात इंदिरा गांधींची सत्ता आहे. बंगाल्यात त्यांचा राज्यपाल आहे. पण हे सगळं होतंच आहे. एखादे वेळी भय वाटतं, की बंगाल भारतात राहणार नाही. थोड्याच दिवसात तो आपल्यापासून दुरावला जाईल. मी महाराष्ट्रात आहे त्यामुळे खूप आतल्या बाजूला आहे. पण असं वाटतं की तिथली यादवी आणि दहशतवाद मुंबई पुण्यावरही लवकरच घोंगवायला लागणार ! आज मुंबईचे सामान्य लोक म्हणतात की कामावर गेलेला माणूस सुखरूप परत आला तर तो आपला ! मुंबईत दिवसा उजेडी लोकलमध्ये तरुण स्त्रियांचे खून व्हायला लागले आहेतच. याशिवाय, गरीब, अश्राप माणसं चाळीचाळीत, दादांच्या आणि गुंडांच्या भीतीनं जीव मुठीत धरून रहात आहेतच. बायकोची छेड काढणाऱ्या गुंडाला नुसतं दटावण्याचंही सामर्थ्य सामान्य माणसात नाही. पोलिसावर तर त्याचा मुळीच विश्वास नाही. पोलिसांची गुंडांना असण्यापेक्षा, गुंडांचीच पोलिसांना जरब आहे. मुंबईच्या आयुष्यात दहशतवाद आज आहेच. खेडोपाडीही तीच तऱ्हा आहे हे सांगायला नकोच.

या दहशतीने माणूस कावून गेला आहे. याशिवाय जीवनात खोटारडेपणा निर्माण झाल्याकारणाने विश्वास असा कशावर राहिलेला नाही. घोषणाबाजीची किळस आलेली आहे. राष्ट्रीय एकात्मता दिन साजरा करायचा आणि थोड्याशा कारणाकरिता कानडी, मराठी किंवा मद्रासी लोकांनी एकमेकांचे गळे दाबायचे. आणि या साऱ्याला राष्ट्रीय पुढाऱ्यांनी प्रोत्साहन द्यायचे ही स्थिती काय दर्शवते? दारूबंदी म्हणायची. आणि काँग्रेस पुढाऱ्यांच्या नातेवाईकांनी गुत्ते काढायचे!... समाजवादचा पुकारा करायचा आणि मंत्र्यांनी मोगल सम्राटापेक्षाही थाटात रहायचे! अशी आजची स्थिती आहे. या वेळी सामान्य माणसानी कुणाकडे बघायचे?

माझ्या मनाला परचक्राची भीती नेहमी वाटत असते. सैनिकीदृष्टचा भारत अत्यंत कमकुवत आहे. या दुर्दैवी देशाबद्दल वेळ आलीच तर कोण जीव खाऊन लढेल, याची शंकाच आहे. पाकिस्तानसारखं भुरटं टीचभर राष्ट्र! पण त्यानंही आपल्या नाकी दम आणले. त्याचा पराभव केला याचीच आपण शेखी मिरवतो. चीनपुढे तर आपण उभेही राहू शकणार नाही. परवाच्या लढाईत चीनने कृपावंत होऊन दिल्ली घेतली नाही. नाहीतर दोन दिवसात दिल्ली पडली असती आणि भारतातल्या नादान लोकांनी तिळमात्र प्रतिकार न करता नव्या राजवटीचे विजयोत्साह साजरे केले असते.

याशिवाय माझ्या मनात हिंदू-मुसलमान प्रश्नाबद्दलही कांही विचार उत्पन्न झाले आहेत. आज भारतात मुसलमानाचा छळ होतो असे मला मुळीच वाटत नाही. पाकिस्तानातून निर्वासितांचे लोंढे या देशावर थडकत असतानादेखील येथील मुसलमान सुखासमाधानाने रहात आहेत हा हिंदू धर्मियांचा मोठेपणा होय.


महाराष्ट्रातील प्रेक्षणीय धार्मिक स्थळे, मार्ग, अंतरे, रेल्वे–एस. टी. सर्व विभागांचे वेळापत्रक, लॉजेसची यादी व दरांचा अंदाज, हॉलीडे कँप–नियम व माहिती, श्री अष्टविनायक मार्ग, जिल्हावार सुबक नकाशे, आकर्षक तीनरंगी मुखपृष्ठ,

प्लॅस्टिक कव्हरे, याशिवाय

डायरीची दोनशे पाने

**प्रवासी डायरी १९७१**

मूल्य : रु. चार + टपालखर्च

दीपा प्रकाशन : ७९७ सदाशिव पेठ, गाडगीळ रोड, पुणे ३०

**TOURIST DIARY 1971** English Rs. 5/–

All India Informative Book. Delure edition Rs. 10/–

परंतु मुसलमानानी मात्र या देशाला निष्ठा दिलेली आहे असे वाटत नाही. उद्या जर परराष्ट्राशी युद्ध सुरू झाले तर बेइमानी करणाऱ्यात मुसलमानांची संख्या इतर धर्मियांच्या तुलनेने फार मोठी असेल हे निर्विवाद. या देशाच्या परंपरांशी मुसलमान समाज समरस झाला नाही याचे कारण काँग्रेसच्या व समाजवादी पक्षाच्या पुढाऱ्यांनी त्यांना नीट हाताळलेले नाही. पाकिस्तान झाल्यानंतर त्यांचा अनुनय संपायला हवा होता. समाजवाद्यांनी किंवा कम्युनिस्टांनी तरी निदान मतांच्या लालचीने त्यांचा वेगळेपणा जोपासायला नको होता. पण तसे घडले नाही. राष्ट्रद्रोहाबद्दल आपल्याला देहांत शासन मिळेल. असा धाक मुसलमानामध्ये उत्पन्न करायला हवा. हिंदू–मुसलमानांचा प्रश्न सर्वांगीण आहे. माझ्या मागे 'श्री.' हे उपपद लावायचे किंवा नाही, माझ्या मृत्यूनंतर माझे विधीपूर्वक दहन व्हायचे किंवा नाही. गंगा–यमुना या पवित्र नद्या आहेत किंवा नाही. रामायण किंवा महाभारत हे श्रेष्ठ ग्रंथ आहेत किंवा नाही हे सर्व प्रश्न यात अंतर्भूत आहेत. ते एकदा निग्रहाने सोडवायलाच हवेत. मुसलमानांना बळानेदेखील काही गोष्टी मान्य करायला लावायला हव्यात. त्यांच्या मतांची भीड पडू नये म्हणून काही वर्षे त्यांचा मतदानाचा हक्क काढून घेतला तरी चालेल. हिंदू–मुसलमानांना समान कायदा असलाच पाहिजे. स्पष्टच सांगायचे तर ख्रिचन, पार्शी किंवा ज्यू या जमातींबद्दल जेवढा विश्वास मला वाटतो तेवढा मुसलमानांबद्दल वाटत नाही.

भारताचे दारिद्रय आणि निरक्षरता ही एक चिरंतनची डोकेदुखी आहे. समाजवादाच्या घोषणांचा तर आता कंटाळा आला. प्रत्येक पक्षच समाजवादी आहे. परंतु स्वार्थाचा बुजबुजाटही प्रत्येक पक्षात आहे. जमिनीची कमाल मर्यादा ठरविण्याचा घाट जरी काँग्रेसने किंवा जनसंघाने घातला तरी तो कधीही सिद्धीस जाणार नाही कारण त्या पक्षातच कित्येक जमीनदार आहेत. काँग्रेसचे कित्येक मंत्री खोटचा पळवाटा काढून जास्त जमीन धारण करतात. अशा अवस्थेत भूमिहीनांचे दारिद्रय नष्ट कसे होणार ? विनोबांच्या भूदान-चळवळीला करमणुकीव्यतिरिक्त जास्त किंमत नाही.

जास्त उत्पादन करणे– निरनिराळ्या कारखान्यांनी खेडीपाडी गजबजून टाकणे हा त्यावर एक उपाय आहे. आज तो होत नाही. साखरेच्या कारखान्याव्यतिरिक्त आज तिथे दुसरे कारखाने नाहीत. कापडाचे, कागदाचे, भांड्याचे कारखाने का निघू नयेत ? जपानसारखे कुटिरोद्योग इथे का निर्माण होऊ नयेत ? पण मला वाटते राज्यकर्त्यांना तशी इच्छा नाही. सधन शेतकऱ्याला दुखवणे कुणालाच जमत नाही. त्यामुळेच आजचा ग्रामीण समाज आळंदी–पंढरपूरच्या वाऱ्यात आणि तमाशांच्या (चुकलो लोकनाट्याच्या) फडात वेळ घालवतो.

स्वातंत्र्यानंतर दोन तपे उलटली तरी ही स्थिती आहे. याला कारण पं. नेहरुंचा

**पृष्ठ ५५ वर**

‘ हिंदुसमाजवादी ’ यांच्या लेखावरील आणखी काही प्रतिक्रिया

# जनसंघ आणि समाजवाद

धनंजय वैष्णव

भारतीय जनसंघ खरे म्हटले तर आजच्या राजकीय पक्षांच्या परिभाषेत न बसणारा पक्ष आहे. या पक्षातील बहुसंख्य कार्यकर्ते हे मध्यम वर्गातील बुद्धीवंत तरुण आहेत. या पक्षाचे पुढारीदेखील बहुतेक अविवाहीत, अकिंचन व राष्ट्रकार्यासाठी कुटुंब जीवनाचे पाश तोडून टाकलेले असे सर्वश्री अटलविहारी वाजपेयी, जगन्नाथराव जोशी, यज्ञदत्त शर्मा, सुंदरसिंग भंडारी हे आहेत. पुढारी व अनुयायी सर्वच नाहीरे (have nots) वर्गातील असताना या पक्षावर ‘ स्थापित हितसंबंधा ’चा ‘ रखवालदार पक्ष ’ असा आरोप करणाऱ्यांचे हेतू प्रामाणिक आहेत असे मला वाटत नाही. आजपर्यंत तरी संपन्नवर्गातील फारसे लोक या पक्षात सामील झालेले नाहीत हे सूर्यप्रकाशासारखे स्वच्छ आहे. अशा तऱ्हेचा आरोप करणाऱ्यांच्या मते ‘ सर्वकष राष्ट्रीयकरणा ’चा पुरस्कार करणारे पक्षच केवळ पुरोगामी व बहुजन समाजाचे कल्याण इच्छिणारे पक्ष आहेत व जनसंघासारखे जे पक्ष सर्वंकष राष्ट्रीयीकरणाला विरोध करतात ते सर्व पक्ष सरंजामवादी व स्थापित हितसंबंधांचे हित रक्षण करणारे पक्ष होत. या लोकांना मी एकच उदाहरण देऊ इच्छितो. ‘ ब्रिटीश मजूर पक्ष ’ हा गेले शतकभर श्रमिक जनतेचा कैवार घेउन झगडत आहे. सुरुवातीला हा पक्ष येथल्या सर्व तथाकथित पुरोगाम्यांप्रमाणेच राष्ट्रीयीकरणाचा कट्टा पुरस्कर्ता होता. पण तो पक्षही आज अशा निष्कर्षाप्रत आला आहे की केवळ अधिकाधिक राष्ट्रीयीकरण म्हणजे समाजवाद नव्हे. सर्वंकष राष्ट्रीयीकरण निश्चितपणे अधिनायक वादाकडे समाजाला खेचून नेते (Total public ownership leads to totalitarianism) आता ब्रिटिश मजूरपक्षालाही हे पुरोगामी विचारवंत ‘ भांडवलशाहीचा पुरस्कर्ता, स्थापित हितसंबधांचा रखवालदार ’ पक्ष ठरविणार आहेत काय ? सोशॅलिस्ट युनियन या ब्रिटिश मजूर पक्षातील स्वाध्याय मंडळाने (Study group) प्रसिद्ध केलेले Twentieth Century Socialism ’ हे पुस्तक येथल्या सर्व समाजवादी म्हणून मिरविणाऱ्या व राष्ट्रीयीकरणाच्या कुठल्याही व कसल्याही योजनेचा पुरस्कार करणाऱ्यांनी जरूर अभ्यासावे म्हणजे स्थापित हित संबधांच्या रक्षणाच्या इच्छेखेरीज राष्ट्रीयीकरणाला समाजहिताच्या दृष्टिनेदेखील विरोध असू शकतो हे त्यांच्या लक्षात येईल. जनसंघ तर राष्ट्रीयीकरण विरोधी पक्ष कधीच नव्हता तो फक्त

प्रत्येक समस्यवर रामबाण उपाय म्हणजे राष्ट्रीयीकरण असे न मानता वास्तववादी भूमिकेवरून त्याचा विचार करतो. भारतासारख्या अविकसित देशात जिथे श्रमबळ भरपूर अस्तित्वात आहे पण भांडवल व यंत्रसामुग्री कमी आहे अशा देशात श्रमप्रधान छोटया यंत्रोद्योगांवर भर देणाऱ्या विकेंद्रीत अर्थव्यवस्थेवर जनसंघाने भर दिला आहे. या छोटया उद्योगांच्या बाबतीत राष्ट्रीयीकरणाचा प्रश्नच उद्‌भवत नसल्यामुळे जनसंघाने राष्ट्रीयीकरणावर भर दिलेला नाही. मुक्त अर्थव्यवस्थेत मक्तेदारी निर्माण होते हे जनसंघालाही मान्य आहे. 'मुक्त अर्थ व्यवस्थेत' हळूहळू खुल्या स्पर्धेचा संकोच होत जातो व शेवटी आर्थिक सत्ता मुठभर लोकांच्या हाती केन्द्रीत होते (दीनदयाळ उपाध्याय–राष्ट्रचिंतन–विकेंद्रीत अर्थव्यवस्था) म्हणून मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणाऱ्या 'स्वतंत्र पक्षा'सारख्या उजव्या पक्षाबरोबर जनसंघाची सांगड घालणे निश्चितच योग्य नाही. आज श्रीमती गांधींच्या लोकशाही विरोधी कृतिला विरोध करण्यासाठी जनसंघ स्वतंत्र पक्षासारख्या लोकशाही मानणाऱ्या पक्षाबरोबर सहकार्य करण्यास तयार असला तरी स्व. दीनदयाळजींनी विकसित केलेले आपले बहुजन कल्याणाचे तत्त्वज्ञान सोडून 'जनसंघ' या पक्षांशी विलीन होईल हे कधीही शक्य नाही. आज परकी कर्जे वाढत आहेत. परकीयांच्या 'technology' बरोबरच परकी हस्तक्षेप वाढत आहे. दुसरे असे की प्रचंड लोकसंख्या असलेल्या भारतासारख्या देशातही 'labour saving technology' आयात करून बडे भांडवलदार किंवा राष्ट्रीयीकृत उद्योगातील 'जिलास'ने वर्णन केलेला व्यवस्थापकांचा, बड्या पगारदारांचा 'वर्ग' निर्माण झाला तरी रोजगार वाढणार नाही व सर्व सामान्य जनतेचे जीवनमान उंचावण्याची मुळीच शक्यता नाही. समाजवादी म्हणविणारे पक्ष व विचारवंत या भारतीय परिस्थितीचा वस्तुनिष्ठ अभ्यास करून वास्तववादी भूमिका घेत नाहीत हीच खरी शोकांतिका आहे. पंडित दीनदयाळजींनी ही परिस्थिती लक्षात घेऊन छोटया उद्योगांचा व विकेंद्रीत अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. मोठ्या उद्योगांच्या क्षेत्रात सरकारी खाते म्हणून, स्वायत्त मंडळ म्हणून किंवा नियंत्रित (Regulated) खासगी उद्योग म्हणून आवश्यकतेप्रमाणे राष्ट्रीयीकृत उद्योग किंवा खाजगी उद्योग (Public sector or Private sector) असावेत पण अर्थरचनेचा भर स्वतंत्र व्यवसायिकांच्या छोटया यंत्रोद्योगांच्या जाळ्यावर (Peoples'sector) असावा असे जनसंघाने आपले आर्थिक धोरण वारंवार जाहीर केले आहे. यात Big business चा किंवा स्थापित हितसंबंधांचा कैवार कोठे आहे ? शेवटी मी एवढेच सांगेन की विचार करणाऱ्या काही समाजवाद्यांनाही हे तत्त्वज्ञान हळूहळू पटत आहे. श्री. अच्युतराव पटवर्धन यांचे बलवंतराय व्याख्यान मालेतील खालील उद्‌गार समाजवाद्यांनी अवश्य मनन करावेत म्हणजे त्यांना जनसंघाच्या भूमिकेचा अन्वयार्थ लागण्याची शक्यता आहे.

" My genration of intelectuals were enamoured of urban ( big scale) industrialisation as the essentials precondition of economic advancement while developement of an urban industrial at base is essential, we should note that whatever the rate of developement of urban (big scale) industry it can not cope with growing unemployment which would be mainly in the rural sector. "

" From the point of view of securing fullest utilisation of resources available with us diversified labur-intensive rural industries with intermediate technology became crucial for our advance, thus proving that India must forge forward on a programme geared to her specific limitations and advantages. She can not hope to borrow blue prints from China or Russia "

जनसंघाने पुरस्कारलेल्या उद्योग विषयक नीतिला मला वाटते आणखी प्रशस्ती पत्राची जरूरी नाही. मार्क्स बरोबरच मानवी प्रतिभा व नव्या समस्यांचा मूलभूत विचार करण्याची माणसाच्या बुद्धीची कुवत संपली असे मानणाऱ्या व समाजवाद, साम्यवाद वगैरे शब्दांची ठोकळेबाज पोपटपंची करणाऱ्या 'हिंदू समाजवादी' सारख्या लेखकांच्या बुद्धीत विसाव्या शतकाच्या समस्या समजून घेण्याची कुवत आहे असे मला वाटत नाही. ते कालबाह्य ठरलेल्या राष्ट्रीयकरणासारख्या कल्पनांचा उदोउदो करून जनतेची दिशाभूल करीतच राहणार पण महाराष्ट्रातल्या बुद्धीवान तरुण वर्गाने ठोकळेबाज सिद्धांताच्या आहारी न जाता 'नव्या विचारांचा' अभ्यास करून निरनिराळ्या पक्षांची धोरणे तपासून पाहावीत. त्यांना कळून चुकेल, की भारतीय परिस्थितीच्या संदर्भात स्व. दीनदयाळजींनी निर्धारीत केलेली जनसंघाची अर्थनिती हा 'विसाव्या शतका'चा समाजवाद ठरणार आहे.

---

# रोजी पाच शेर दूध देणारा बैल !

वाल्मिक मेढेकर

---

काय खळबळ निर्माण करणारे शीर्षक आहे की नाही ? घोषणा नेहमीच आकर्षक आणि खळबळजनक असतात. कारण त्या जनसामान्यांचे लक्ष चटकन् वेधून घेतात आणि त्या पूर्णत्वास नेण्याची घोषणा करणारांची जबाबदारीही नसते. इच्छा तर मुळीच नसते. घोषणा करणाऱ्यांना प्रसिद्धी मिळते– छापणाऱ्यांना वाढीव खप

व पैसा मिळतो. इतरेजनांना चटकदार मजकूर मिळतो ' टाइमपास ' चांगला होतो. आपल्या " भगवा ध्वज-कोयता हातोडा " या लेखाची उपरोक्त वक्तव्याव्यतिरिक्त जर अन्य आवश्यकता असेल तर माझीही प्रतिक्रिया कळवित आहे.

पाच शेर दूध देणारा बैल ही कल्पना कदाचित चांगली असली तरी अनैसर्गिक एवं अशक्यप्राय आहे. तद्वत्‌च भगवा ध्वज कोयता हातोडा ही वांछनीय युती वाटली तरी मृगजलीय अभासवत् वाटते. लोकशाही समाजवाद एकवेळ शक्य परंतु लोकशाही साम्यवाद हे वदतोव्याघाताचे उत्कृष्ट उदाहरण ठरेल.

देशातील राजकारणाची अवरुद्ध कोंडी फुटावी अशी आणि एवढीच जर ' हिन्दू समाजवादी ' यांची प्रामाणिक इच्छा असेल तर त्यासाठी वेगळा पक्ष काढणे ही प्रश्नाची सोडवणूक भ्रामक वाटते. आज अस्तित्वात असलेल्या भाराभार चिंध्यात आणखी एक भर पडेल याशिवाय काही होणार नाही. जे नवनवीन पक्ष उदयाला आले ते या देशाचे भले करावे म्हणून नाही तर राष्ट्रीय सभेच्या नेत्यांना जे मिळते ते आपणास हे नेते असेपर्यंत मिळणार नाही. कारण आपणहून ते सत्यात्याग करून इतरांना संधी देतील हे अशक्य आणि त्यांच्यातून बाहेर पडल्याशिवाय विरोधात राहून लोकप्रियता मिळणार नाही म्हणून बहुतेक वेग-वेगळ्या चुली निर्माण करण्यात आल्या तेव्हा ' हिंदूसमाजवादी ' यांनी आपला हेतू प्रथमतः निश्चित करावा आणि मग वेगळी चूल की असलेल्या पक्षातील त्यातल्या त्यात सुधारू शकेल व समाजभिमुख होऊ शकेल असा पक्ष निवडायचा हे ठरवावे. परंतु त्याआधी त्यांना नकारात्मक भूमिका सोडावी लागेल. अमुक पक्ष असा वाईट म्हणून मी म्हणतो तोच पक्ष चांगला ही अहंता सोडावी लागेल. टीकालेख लिहून मोहोळ उठविण्यापेक्षा लोकमत जागृत होण्यासाठी लोकांना चांगले व वाईट काय हे हंसक्षीर न्यायाने पटवून दिले पाहिजे. मुस्लिमविरोधी धोरण ठेवून जनसंघ वाढतो ही भूमिका पटविताना जनसंघ वाईट म्हणून हिंदू समाजवादी पक्ष चांगले अशी जनसंघाचीच भूमिका हिंदू समाजवादी घेतात, हे त्यांच्या लक्षात आलेले दिसत नाही.

भारतीयकरणाच्या घोषणेमुळे बऱ्याच लोकांचे पोटशूळ उठले आहेत. परंतु जे स्वतःला भारतीयच समजतात त्यांना भारतीयकरणाचा राग येण्याचे मुळी कारणच काय ? भारतीयकरण म्हणजे सक्तीचे धर्मांतर नव्हे. परंतु असा मुद्दाम प्रचार करण्यामागे एकच हेतू असणे शक्य आहे तो म्हणजे ज्या अभारतीय व परदेशीय वा परकीय सत्ता भारतात सत्तेवर याव्या असे ज्यांचे प्रयत्न आहेत त्यांना भारतीयकरणापासून धोका उत्पन्न होऊ नये. आज भारतात राहूनच ' पाकिस्तान झिंदाबाद ' ' माओ चिरायु होवो ' ' जगाच्या ¾ भागावर असणारा लाल झेंडा भारतात लवकरच आणू ' हे उघडपणे राजरोसपणे लोकशाहीचा दुरुपयोग करून म्हणता येते. भारतीयकरणामुळे याला पायबंद बसू नये म्हणून हेतुतः अपप्रचार केला जातो आहे. मोठमोठी वृत्तपत्रे–विद्वत्जन यांना भरपूर मुखलेपन करून सत्याचा

अपलाप आणि मुखभंग केला जात आहे. आप्रण त्याला बळी पडत आहोत हे दुर्दैव.

मूठभर जहागीरदार आणि संस्थानिक यांच्या पाठिंब्यावर जनसंघ सत्तेवर येईल अशी जर जनसंघवाल्यांची समजूत असेल तर They are living in fools' paradise असे म्हणावे लागेल. परंतु बहुमतासाठी त्यांना बहुजनसमाजाकडे जावेच लागेल आणि बहुजनसमाजासाठी काहीतरी केल्याशिवाय त्यांच्याजवळ मते मागण्याचे धैर्य असणार नाही कारण राष्ट्रीय सभेसारखी पूर्वपुण्याई जनसंघाकडे नाही. परंतु जनसंघ दलितोद्धाराचा कार्यक्रम हाती घेणारच नाही असे म्हणणे अन्यायकारकच नव्हे द्वेशमूलकही होईल. टीका किंवा शिक्षा यांचा हेतू सुधारणेसाठी व्हावा. नामोहरम किंवा सूडासाठी करण्यासाठी होऊ नये. हे हिंदू समाजवादी हे प्राध्यापक असल्यामुळे त्यांना मान्य व्हावे.

भूमी बळकविण्याने किंवा नक्षलवादी चळवळींमुळे आर्थिक विषमता दूर होईल असे प्रा. महाशयांना वाटते की काय नकळे? किंवा ते त्याकडे सहानुभूतीने कसे पाहू शकतात याचे मला आश्चर्य वाटते. कारण या दोन्ही चळवळींच्या मागे पराकोटीचा अन् आत्यंतिक नैराश्यवाद आहे. राष्ट्रीय संपत्तीचा नाश करून—कारखाने जाळणे, शेते कापून टाकणे, गाड्या मोडणे याने आधीच कमी असलेली राष्ट्रीय मालमत्ता आणि अर्थोत्पादनाची साधने कमी होतील आणि आर्थिक अन्याय कमी होण्याऐवजी वाढेल. ही माझ्यासारख्या अज्ञ माणसास कळणारी गोष्ट इतरांना कळत नाही असे नव्हे. परंतु साम्यवाद (लाल–पिवळा) आणण्यासाठी पूर्वपीठीका तयार करणे हाच या मागचा उद्देश आहे. गेल्या अनेक दशकात बौद्धिक प्रचारात्मक पातळीवर प्रयत्न करूनही साम्यवाद येत नाही म्हणून आता दहशतीच्या मार्गाने व अराजकाच्या मार्गाने साम्यवाद आणण्याचा हा प्रयत्न. यात वैफल्य किंवा दलित वर्गाची कळवळ वगैरे काही नसून साम्यवाद जबरदस्तीने लादण्याचा पद्धतशीर प्रयत्न आहे.

भूमी बळकावण्याचे आंदोलन हा लोकशाही मार्गाने साम्यवाद आणण्यासाठी केला जाणारा स्टंट आहे. भूमी बळकविण्याने स्वामित्व मिळत नाही तसेच एकदा बळकाविलेली जमीन दुसरा बळकावणार नाही याची खात्री काय? म्हणजे आज द्रव्यामुळे अधिक भूमिसंचय होतो आहे तो पुढे शस्त्रबलामुळे किंवा झुंडशक्तीमुळे होईल. शिवाय जमीन कमी आणि इच्छुक जास्त झाल्यावर रक्तपात होऊनही प्रश्न सुटणार नाही. म्हणजेच रोगापेक्षा उपाय जीवघेणा आहे. दुसरे असे की देशांतर्गत भूमीचा प्रश्न आपण बळकावण्याने सोडवणार असलो तर परकीय राष्ट्रांनी त्यांना जाणवत असलेल्या भूमीचा प्रश्न आपली भूमी बळकावून सोडवला तर आपण त्यांना कुठचे तोंड दाखवणार. राष्ट्रातील सीमांचे प्रश्न वा प्रांतांचे प्रश्न सोडवण्याचा हा साम्यवादी प्रयत्न राष्ट्रभक्तांना चालेल काय?

श्री. ग. मां. ना जनसंघ, साम्यवाद विरोधी आहे याचे वैषम्य वाटते. जनसंघाची

नकारात्मक भूमिका मान्य केली तरी साम्यवाद्यांची होकारात्मक विधायक (constructive) कार्य कोणते ? केरळमध्ये साम्यवादी राजवट बरीच वर्षे आहे तरी देखील केरळीय जनता अजून दुःख-मुक्त का बरे झाली नाही ? मुंबईसारख्या भांडवलशाही नगरीत त्यांचा अविरत लोंढा का बरे येतो ? साम्यवादी तत्त्वज्ञान जर सर्व प्रश्नांचा त्वरित निकाल लावते तर भारत अजून मुक्त का झाला नाही ? साम्यवाद परकीय आहे म्हणून वाईट नाही; तर आमच्या डोक्यास घट्ट बसणारी टोपीच आम्ही घातली पाहिजे, म्हणून साम्यवाद पोथीबरहुकूम आम्ही स्वीकारू शकत नाही. कपडा चांगला दिसतो म्हणून घालण्यापेक्षा आम्हास अंगाबरहुकूम होत असेल तरच आम्ही घातला पाहिजे; होत नसेल तर करवून घेतला पाहिजे. परकीय गोष्टी अंधानुकरणांनी – भयडंगानी किंवा न्यूनगंडाने स्वीकारल्या जाऊ नयेत यासाठी तरुणांनी जागरूक असलेच पाहिजे. समाजवाद चांगलाच परंतु समाजवादाच्या नावाखाली समाजाला अधिक दरिद्री, लाचार, दुबळे परावलंबी, गुलाम करून स्वतःची सत्ता टिकविणे किंवा आपल्याच पोळीवर तूप ओतून घेणे हा हेतू असेल तर तो मुळापासून उखडला पाहिजे. राष्ट्रीयीकरण म्हणजे सरकारीकरण न होता समाजीकरण झाले पाहिजे. राष्ट्रीयीकरण करण्याने समाजाच्या अस्तित्वात असलेल्या कष्टात अधिक भर पडणार असली तर राष्ट्रीयीकरण समाजविरोधी समजले गेले पाहिजे. प्रत्येक गोष्टीचा मुलभूत विचार करून निव्वळ घोषणांवर आपण फसता कामा नये.

सामाजिक व आर्थिक न्याय समाजातल्या शेवटच्या घटकाला मिळाला पाहिजे हे नग्न सत्य आहे. तरुणांनी आपल्या आवडत्या पक्षाला हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भाग पाडले पाहिजे. परंतु नुसती अकरणात्मक टीका न करता किंवा डोळ्यात बोटे न घालता, शिवीगाळ करण्यात किंवा नुसत्या चुका दाखवत न बसता स्वतः हिरीरीने भाग घेऊन, आम्ही हे करू, आम्हाला हे केलेच पाहिजे या जिद्दीने !

⌑ ⌑ ⌑

# मराठवाड्याची हालहवाल

**देवदत्त तुंगार**

## विद्यापीठ-कुलगुरू निवडीचा प्रश्न

मराठवाडा विद्यापीठाची स्थापना १९५८ साली औरंगाबाद येथे झाली. विद्यापीठ स्थापनेनंतर पाचही जिल्ह्यात उच्चशिक्षणाच्या प्रसारास चांगली गती मिळाली. विद्यापीठ स्थापनेनंतर पहिली सहा वर्षे श्री. सुंदरराव डोंगरकेरी हे कुलगुरू होते. त्यानंतर डॉ. नानासाहेब तावडेंसारखे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ कुलगुरू म्हणून विद्यापीठास लाभले. जून १९७० मध्ये कुलगुरूपदाची त्याची मुदत संपली. तीन वर्षासाठी पुन्हा त्यांनाच कुलगुरूपद मिळावे अशी अनेकांची इच्छा होती व आहे. मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू सरकारकडून नेमले जातात, इतर कुलगुरूं-प्रमाणे त्यांची निवडणूक होत नाही. कुलगुरू निवड समिती तीन (किंवा अधिक) नावे सुचविते व त्यापैकी एकाची ' निवड ' सरकार करते. कुलगुरू निवड समितीने सर्वश्री देवीसिंग चौहान, व्यंकटराव जाधव, भाई गोविंददास श्रॉफ, प्राचार्य म. भि. चिटणीस, सिकंदर अली वज्द आदींची नावे सुचविली असे सांगण्यात येते. श्री. देवीसिंग व श्री. गोविंदभाई यांच्यातच खरी ' लढत ' आहे असे बोलले जाते. गोविंदभाईंची निवड होण्याची शक्यता आहे असे मराठवाड्यातील काही वृत्त-पत्रातून अंदाज व्यक्तविण्यात येत आहेत. श्री गोविंदभाई हे शिक्षकांच्या हिताच्या विरोधी (Anti-teacher Community) आहेत असा सार्थ समज मराठवाड्या-तील प्राध्यापकात आहे. कोणत्याही प्राध्यापकाला सहा महिन्याचा पगार देऊन नोकरीतून काढून टाकण्याचा ठराव विद्यापीठात श्री. गोविंदभाईंच्या पुढाकारानेच आला होता. त्यामुळे शिक्षक-समुदायात त्यांची 'प्रतिमा' (Image) चांगली नाही. श्री देवीसिंग यांची प्रकृती व प्रवृती सत्ताधाऱ्यांना मानवणारी नाही. त्यामुळे कुलगुरू निवडीचे घोंगडे भीजत पडले आहे. त्यामुळे यातून मार्ग काढण्यासाठी सध्याचे कुलगुरू डॉ. तावडे यांनाच मुदतवाढ देणे योग्य होईल अशी अनेक शैक्ष-णिक कार्यकर्त्यांची भूमिका आहे. अत्यंत गरीब परिस्थितीतून डॉ. तावडे पुढे आले असून बहुजनसमाजाच्या तरुण गरीब विद्यार्थ्यांच्या अडचणी काय आहेत याची त्यांना पूर्ण कल्पना आहे.

## गोदातीर समाचारचा वर्धापन दिन

नांदेडचे श्री. दे. गं. रसाळ हे मराठवाड्यातील अग्रगण्य पत्रकार आहेत. नांदेड येथे 'प्रतिभा' हे पहिले साप्ताहिक त्यांनी सुरू केले. 'गोदातीर समाचार' दैनिक ९ वर्षापासून ते चालवीत असून १ जानेवारी १९७१ पासून सदर दैनिक दहाव्या वर्षात पदार्पण करीत आहे. गोदातीरच्या वर्धापन दिनानिमित्त १ जानेवारीस पान-सुपारी बरोबरच एक सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्याचा त्यांचा मानस असून प्रमुख पाहुणे म्हणून कोल्हापूरचे पूज्य श्री. दत्ता बाळ यांना निमंत्रित करण्याचे त्यांनी ठरविले आहे. 'गोदातीर समाचार' दैनिकाने मराठवाड्यातील नांदेड-परभणी जिल्ह्यात व इतरत्रही स्वतःसाठी खास स्थान निर्माण केले आहे. कोणत्याही राजकीय पक्षाचा पाठपुरावा न करता अपक्षीय भूमिकेवरून वृत्तपत्र चालविणे फार अवघड आहे. हे कार्य श्री. रसाळ करीत आहेत. मानवेन्द्र नाथ रॉय यांच्याबरोबर कार्य करण्याची संधी त्यांना मिळाली होती. एक रॉयिस्ट म्हणून त्यांचा लौकिक आहे. आदर्श स्वरूपाचे स्थानिक पत्र (Ideal Local Paper) म्हणून 'गोदातीर'कडे जाणकार ज्येष्ठ पत्रकार अंगुलीनिर्देश करतात.

## युवक क्रांतिदलाचा मेळावा

युवक क्रांतिदलाच्या नांदेड शाखेतर्फे नुकताच एक मेळावा आयोजित करण्यात आला. प्राचार्य शिरवाडकर यांनी उद्घाटनपर भाषणात समाजाचे प्रश्न सोडविण्याची शुद्ध निष्ठा कोणत्याच राजकीय पक्षात नसल्याने युवकांनीच संघटित होऊन हे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन केले. प्रसिद्ध साहित्य टीकाकार प्रा. नरहर कुरुंदकर यांनी आपल्या भाषणात जातिव्यवस्थेमुळे हिंदू समाजात निर्माण झालेल्या विकृतीवर प्रकाश झोत टाकून हिंदू समाजावरील जातिव्यवस्थेचा पगडा अजून कायम आहे असे सांगितले. अशिक्षितापेक्षा सुशिक्षितच जातीयतेची विषवल्ली जोपासण्यास अधिक कारणीभूत आहेत असे सांगून माणसे गुलाम केलेल्या भूतकाळाचा अभिमान व सामाजिक परिवर्तनाची आकांक्षा या दोन्ही गोष्टी एकाच वेळी आपण करू शकत नाही असे प्रा. कुरुंदकरांनी प्रतिपादन केले.

सुमारे २०० विद्यार्थी व इतर तरुण मेळाव्यास उपस्थित होते. सर्वश्री मोरेश पाठक, भुजंग गावंडे, दत्ता भगत इत्यादींनी चर्चेत प्रामुख्याने भाग घेतला.

युवक क्रांतिदलाच्या मेळाव्याप्रमाणेच नांदेड युवक संघाच्या बैठकीत कॉ. व्ही. डी. देशपांडे यांचे झालेले भाषण दखल घेण्यासारखे होते. इंदिरा गांधींनी पुरोगामी समाजवादी पावले उचलण्यास प्रारंभ केला असून त्यास पाठिंबा देण्यासाठी युव-

कांनी राजकारणात भाग घ्यावा असे आवाहन करून विद्यापीठात पदवीपूर्व व पदव्युत्तर विभागातून विद्यार्थ्यांना प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे असे त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले. युवक संघाच्या बैठकीत कल्याणकर, पाठक, शेवडीकर, आदींनी भाग घेतला.

## नांदेडचा गुरुद्वारा

शीखांचे शेवटचे गुरू गोविंदसिंघ महाराज यांची समाधी नांदेडला असून येथील गुरुद्वारा हे सर्व शीखांचे पवित्र स्थान आहे. या गुरुद्वाऱ्याची व्यवस्था पाहण्यासाठीं एक बोर्ड असून सदर बोर्डावर १७ सदस्य असतात. या सदस्यांच्या निवडीबाबत जे नियम आहेत ते सदोष असल्याने स्थानिक शीखांना योग्य प्रतिनिधित्व मिळत नाही अशी तक्रार 'नूतन गोदावरी टाइम्स' या नांदेडच्या हिंदी साप्ताहिकाचे संपादक व शीख समाजातील एक कार्यकर्ते श्री. अमरसिंघ यांनी नुकतीच केली आहे. महाराष्ट्र सरकारने विधानसभेत यासंबंधी संशोधित विधेयक मांडावे व स्थानिक कार्यकर्त्यांची होणारी उपेक्षा थांबवावी असे आवाहन त्यांनी केले आहे.

## थंडीचा विलक्षण कडाका

विलक्षण थंडीच्या कडाक्याने नांदेडकर त्रस्त झाले. अनेक वर्षांत पडली नव्हती अशी थंडी सध्या नांदेडला पडली असून काही जनावरेही त्यामुळे दगावली आहेत. थंडीचा कडाका संक्रांतीपर्यंत तरी कमी होण्याची शक्यता नाही. पीकपाण्याचेही त्यामुळे नुकसान झाले आहे. अतिवृष्टी व थंडीमुळे पीक हातचे गेले. दुष्काळी कामे त्वरित सुरू करावीत यासाठी डाव्या कम्युनिस्टांचे कार्यकर्ते श्री. नागोराव जाधव, उजव्या कम्युनिस्टांचे श्री. हणमंतराव बिजूरकर व इतर पक्षांच्या नेत्यांनी जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. पद्मश्री शामराव कदम व व्ही. डी. देशपांडे यांनी शिष्टमंडळे नेली. महसूल मंत्री ना. भाऊसाहेब वर्तक यांनी नांदेड जिल्ह्यातील ११८९ पैकी ११४९ गावांच्या खरीप पीकांची आणेवारी ४ आण्यापेक्षाही कमी असल्याचे सांगितले असून तगाई व शेतसारा वसूली स्थगित करण्याचे सरकारने ठरविले असल्याचे नुकतेच घोषित केल्याने थोडाफार दिलासा मिळाला आहे. आता कागदोपत्री घोळ न घालता त्वरित दुष्काळी कामे सुरू केली पाहिजेत.

□ □ □

# हे कलकत्ता !

सौ. तारा पंडित

## ' श्रीकाकुलम् शिखा दिलो जोद्दार के मारो '

श्रीकाकुलम्ने आदेश दिलाय जमीनदारांचे खून करा

हे वाक्य अलीकडे बसेसवर, घरांच्या भिंतींवर अन् जागा सापडेल तिथे लाल अक्षरात लिहिलेलं दिसतं. त्या लाल रंगामुळे नजर आकर्षित होते आणि नकळत ती अक्षरं वाचलीच जातात. आश्चर्य असं की भिंतीवरची अक्षरं राहोत पण बसवरची अक्षरं पुसण्याची दखलही आजवर कुणीच घेतली नाही. पोलीस खात्यानेही ती पुसून टाकण्याचा आदेश कधी दिला नाही. ते बेपर्वाच राहिले आणि नक्षलवाद्यांनी नेत्यांच्या आज्ञेचं पालन करणं सोडलं नाही. परिणामतः भराभर खून पडू लागले. त्या खुनांना बळी पडलेले लोक बहुधा सावकार, जमीनदार किंवा मोठमोठे शेतकरी असेच होते. हे खून भर दिवसाढवळ्या झाले–कोणी बाजारातून घरी परतत असताना तर कोणी गाढ झोपेत असताना. थोडक्यात, प्रत्येकजण बेसावध अवस्थेतच मारला गेला. हा खुनांचा प्रकारही अगदी एकसारखा–शिर अलगद धडावेगळे केलेले ! याचा अर्थ माओच्या सूचनांची पुरेपूर अंमलबजावणी होत असते असं दिसलं !

मग राचीला पोलिसांची एक बैठक झाली. पश्चिम बंगाल, बिहार आणि ओरिसामधील सारे तज्ज्ञ एकत्र आले. खूप खलबतं झाली. हे नक्षलवादी असे का वागतात ? आदिवासी लोकांना फूस लावून इतरांवर सूड घेण्यासाठी त्यांना प्रवृत्त का करतात ? ह्यांचे अड्डे कुठे असतात ? इत्यादीबाबतीत खूप चर्विचरण झालं. ह्यात एक गोष्ट निदर्शनाला आली ती अशी–छोटा नागपूर विभागातील जंगल आणि पर्वतांमुळे नक्षलवाद्यांच्या KILL AND RUN योजना यशस्वी ठरण्यास फार फार मदत झाली आहे.

## गंमत म्हणून !

एका मुलाने आपल्या शाळेच्या एका मास्तरांना एक निनावी पत्र पाठविले आणि कित्येक हजार रुपयांची मागणी केली. शिवाय ही रक्कम देण्याचे नाकारल्यास त्यांच्या मुलाचा खून पडेल अशी धमकीही पत्रात दिली. ह्या पत्रावर CPI–ML चा शिक्का होता. ते पत्र डिटेक्टिव्ह डिपार्टमेंटचे डेप्युटी कमिशनर श्री. रॉय

यांच्या हाती गेले. मुलाला तावडतोब पकडण्यात आले. आपणच ते पत्र लिहिले असल्याचे मुलाने कबूल केले. तो म्हणाला, मास्तरांची जरा गंमत करावी ह्या हेतूनेच त्याने पत्र लिहिले होते. हा मुलगा या वर्षी सिनियर केंब्रिजच्या परीक्षेला बसला आहे आणि विशेष म्हणजे तो येथील एका नटीचा मलगा आहे.

## बंगला बंद

ता. ८ डिसेंबर रोजी ' बंगला बंद 'चा निर्णय घेतला गेला. एकूण १४ राजकीय गट आणि ट्रेड युनियन ऑर्गनायझेशन्स यांनी ह्या हरताळास पाठिंबा दिला तर तीन गटांनी विरोध केला. शहरात विपरीत प्रकार घडू नयेत म्हणून राज्यकर्त्यांनी मिलिटरी सावध केली.

आठ तारीख उजाडली. सर्वत्र सामसूम होती. पुढचे चोवीस तासदेखील सारं शहर झोपेतच राहिलं. मग कुणी चकाट्या पिटल्या. कुणी पत्ते खेळून करमणूक करून घेतली. कुणी झोपा काढल्या. सारा दिवस आळस आणि आराम करणे ह्या-शिवाय लोकांना कार्यक्रमच उरला नाही. अखेर ह्या अवस्थेचाही लोकांना कंटाळा येतोच. केव्हा एकदा बस–ट्राम सुरू होतात अन् आपण बाहेर पडतो असं होऊन जातं.

हरताळ पार पडला. निरनिराळ्या राजकीय गटांनी विजयाचे ढोल पिटले. सतत कामाच्या रगाड्यात पिसल्या जाणाऱ्यांना थोडी विश्रांती मिळाली. पण ह्या हरताळामुळे इतर परिणाम काय झाले ?

मुख्य गोष्ट अशी की सामान्य लोकांना हा हरताळ हवा होता की नको होता याची कुणालाच पर्वा नव्हती. तो निव्वळ त्यांचेवर जबरदस्तीने लादला गेला होता. कसलीही आफत येऊ नये ह्या भीतीने बिचारे घरातच बसून राहिले. सर्वसाधारण लोकांची स्मरणशक्ती विशेष तीव्र नसली तरी यापूर्वी झालेल्या हरताळ व बंदचे परिणाम कोणी विसरू शकणार नाहीत. आजवरच्या हरताळामुळे असे कोणते उद्देश साध्य झाले ? कोणत्या समस्या सुटल्या ? उलट अनेकांना त्याचे दुष्परिणामच भोगावे लागले. छोटे दुकानदार, फुटपाथवर माल विकणारे, हातगाड्यांवरचा माल विकणारे, रिक्षावाले, भिकारी आणि जे जे म्हणून रोजाने कमाई करणारे आहेत त्या सर्वांना एक दिवसाची कमाई गमवावी लागली. एवढंच नव्हे, पशुपक्षांनादेखील अशावेळी काही मिळत नाही. तेही उपाशीच राहतात.

तसे हरताळाचे परिणाम तर आदल्या दिवसापासूनच भोवू लागतात. बाजारात जावे तो सर्व आवश्यक वस्तुंचे भाव एकदम चढलेले आढळतात, कारण दुसऱ्या दिवशी हरताळ असतो. काळा बाजार करणाऱ्यांना हे अप्रत्यक्ष प्रोत्साहनच नव्हे काय ? ' बंगला बंद 'चा निर्णय घेणारांना ह्या सत्य परिस्थितीची कल्पना का येऊ नये ? ज्या बंगालमध्ये खून आणि हल्ले हा रोजचा व्यवहार गणला जातो त्याच बंगालमध्ये एक दिवस असाही येतो ज्या दिवशी सगळं काही ' बंद ' असतं !

## जात्रापार्टी

लोकनाटचाच्या प्रकाराला बंगालमध्ये 'जात्रा' असं म्हणतात. ही जात्रापार्टी ठिकठिकाणी हिंडून आपले कार्यक्रम करीत असे. जात्रा म्हणजे उघडचा रंगभूमीवर करण्यात येणारं पौराणिक नाटक. गॅसबत्तीच्या प्रकाशात नट आपल्या भूमिका तल्लीन होऊन करतात आणि लोक मैदानात बसून ते नाटक मोठ्या चवीने बघतात. क्वचित् शहरांमध्ये पण ही जात्रापार्टी कार्यक्रम करीत हिंडत असते.

अशीच एक जात्रापार्टी कलकत्त्यात आली. एके ठिकाणी त्यांचा बहारदार कार्यक्रम झाला. मध्यरात्रीनंतर कार्यक्रम संपला. प्रेक्षक तृप्त होऊन घरोघर निघन गेले. आणि थकला भागलेला नटवर्ग आपली आयुधं सांभाळीत, हळूहळू चालत, गप्पा करीत दुसऱ्या मुक्कामावर निघाला.

त्या दिवसात शहरात वातावरण जरा तंग होतं. नक्षलवाद्यांचा त्रास सुरू झाला होता. रात्रभर पोलिसांच्या गाडचा रस्तोरस्ती हिंडत होत्या. त्यातलीच एक गाडी ह्या नटांना आडवी आली. हातात धनुष्यबाण, गदा, भाले, तलवारी इत्यादी शस्त्रास्त्रे घेतलेली ही माणसे पाहून पोलिसांना संशय येणं अगदी साहजिकच होतं.

समोर पोलीस पाहून त्या नटांना नवल वाटलं. आपल्याशी यांचं काय काम असावं याचा ते विचार करू लागले. प्रश्नार्थक मुद्रेने पाहू लागले.

पोलिसांनी हुकूम केला-- 'चला, गाडीत बसा.'

'कशासाठी ?'

'ठाण्यावर न्यायचंय तुम्हाला.'

'पण का ?'

'तुम्ही रात्रीबेरात्री ही शस्त्रास्त्रे घेऊन हिंडताहात म्हणून तुम्हाला पकडण्यात येत आहे.'

यावर नटवर्गातला भीम जोरजोराने हसू लागला. आपली हलकीफुलकी गदा पोलिसासमोर धरीत म्हणाला.

'अहो, ही आयुधं टिनाची आहेत.'

'पण आयुधं आहेत ना, तेव्हा चलावंच लागेल.' पोलिसांचे विधान.

'अहो, पण आम्हाला नाटकासाठी ह्या वस्तू लागतात...जात्रापार्टीचे लोक आम्ही !'

'जात्रापार्टी ?...म्हणजे कोणती तरी पार्टी आहे... खर ना ?... बस्स ! यापुढे बोलू नका. पोलीस ठाण्यावर गेल्यानंतर तुम्हाला काय सांगायचं असेल ते सांगा. मुकाटचानं गाडीत चढा.'

आणि पोलिसांनी साऱ्या नटांना त्यांच्या आयुधांसह गाडीत कोंबलं.

◻ ◻ ◻

‘ माझे बोलणे कोणी ऐकणार नाही.
त्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही.
पण ‘ कोसा नोस्त्रा ’ अमेरिकेतील
दुसऱ्या सरकारप्रमाणे आहे. ’

जो वालाची याचे हे उद्गार
प्रत्यक्ष दुसऱ्या सरकारच्या प्रवक्त्याचेच.

# माफिया माफिया माफिया माफिया

विजय वैद्य

वॉशिंग्टन अमेरिकेची राजधानी. एका बलाढ्य देशाची प्रचंड राजधानी, पण दिव्यांनी उजळून निघणाऱ्या राजधानीवर काही ठिकाणी संध्याकाळी भीतीची गडद छाया पडते. स्त्रियाच काय पण पुरुषही संध्याकाळनंतर अशा ठिकाणी एकट्यादुकट्याने फिरायला धजत नाहीत. व्हाइट हाऊस-राष्ट्राध्यक्षांचे निवासस्थान म्हणजे आजूबाजूला कडक पहारा, वर्दळ, गस्त आदी जोरात सुरू. पण व्हाइट हाऊसच्या परिसरातही मधून मधून गुंडगिरी, वाटमारी आदी प्रकार होत असतात. संघटित गुन्हेगारीने आज अमेरिकेला पछाडले आहे.

‘ माझे बोलणे कोणी ऐकणार नाही, त्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही, पण ‘कोसा नोस्त्रा’ अमेरिकेतील दुसऱ्या सरकारप्रमाणे आहे. ’ पूर्वी ठक असलेल्या व नंतर पोलिसांना माफियाबद्दल खबर पुरवणाऱ्या जो वालाची याचे हे उद्गार. प्रत्यक्ष ‘ दुसऱ्या सरकार ’च्या प्रवक्त्याचेच उद्गार असे मानायला बिलकूल हरकत नाही.

सुमारे एकसष्ट सालाच्या आरंभी एफ्. बी. आय्. (फेडरल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टीगेशन)चे प्रमुख श्री. हूवर यांनी अशा प्रकारची संघटित गुन्हेगारी करणारी टोळी असल्याच्या बातमीचा इन्कार केला होता. ज्या कुणाला याची चुटपुटती कल्पना होती त्यांना 'ल कोसा नोस्त्रा'च्या कार्यपद्धतीचीच काय पण नावासंबंधीही माहिती नव्हती. असे असूनही नकळत या संघटनेने अमेरिकी जीवनावर जबरदस्त ठसा उमटवला होता. आता मात्र प्रत्येकाला 'ल कोसा नोस्त्रा' उर्फ 'माफिया'बद्दल पूर्ण कल्पना व माहिती आहे. अमेरिकन काँग्रेसमध्ये (संसदेत) संघटित गुन्हेगारीविषयी येणाऱ्या कोणत्याही प्रश्नाला अग्रक्रम दिला जातो. माफियाशी सामना देण्याकरिता अनेक राज्ये पोलिसदलांना खास शिक्षण देत आहेत. माफियावर अनेक पुस्तके, चित्रपट तयार करण्यात आले आहेत आणि ही पुस्तके प्रचंड खपाची ठरली आहेत. चित्रपटांना अलोट गर्दी लोटते. अलीकडेच म्हणजे गेल्या सप्टेंबरात मुंबईच्या मेट्रो चित्रपटगृहात 'स्टिलेटो' नावाचा माफियावरील चित्रपट अनेकांनी पाहिला असेल. न्यू एम्पायर येथे लागून गेलेल्या 'इटालियन जॉब'मध्येही 'माफिया'ची झलक दाखविण्यात आली होती.

कोट्यावधी डॉलर्सचा अपहार करणाऱ्या, बड्या बड्या सरकारी अधिकाऱ्यांचा अवमान करणाऱ्या, कारखानदार व तत्सम व्यवसायींना वाईट मार्गावर नेणाऱ्या आणि सामान्य माणसाचा जीव कस्पटासमान लेखणाऱ्या माफियासारखी एखादी संघटित गुन्हेगारी टोळी अमेरिकेत अस्तित्वात आहे यावर विश्वास ठेवणे अनेक अमेरिकन लोकांना कठीण जाते.

लहानमोठे उद्योगधंदे, उद्योगपती आणि कामगार, अमेरिकेची संसद, पोलिसदले आदी अमेरिकन जीवनातील प्रत्येक ठिकाणी माफियाने प्रवेश केला असून हे जीवन त्यांनी ग्रासून टाकले आहे. लहान मोठ्या प्रमाणातील रक्तपात हा तर त्यांचा नित्यक्रमच आहे. मादक द्रव्यांचा व्यापार व परदेशातून त्याची आयात हा 'माफिया'चा एक प्रमुख धंदा. संघटित गुन्हेगारीचे नेहमी जवळून दर्शन घेणाऱ्यांच्या दृष्टीने सरकारी अधिकाऱ्यांनी व सरकारने कायदा व सुव्यवस्था पाळण्यासंबंधी केलेली विनंती म्हणजे अमेरिकेत एक प्रचंड विनोद होऊन बसला आहे.

सुमारे ३ हजार ते ५ हजार व्यक्तींनी बनलेल्या एकूण २४ कुटुंबात 'माफियाच्या' संघटित गुन्हेगारीची विभागणी झालेली आहे. यात बहुसंख्य इटालियन्स आहेत. त्या खालोखाल ज्यू आणि ग्रीक लोक आहेत. प्रत्येक 'माफिया कुटुंबा'चा एक प्रमुख दादा – बॉस – असतो आणि त्याच्या आज्ञा त्या प्रत्येक टोळीला पाळाव्या लागतात. इतर बॉसेसच्या नव्हेत. टोळ्या जवळ जवळ सैन्याच्या धर्तीवर संघटित केलेल्या असतात. पण देशातील निरनिराळ्या ठिकाणी संघटित करायच्या मोहिमांचे नेतृत्व व नियंत्रण करणारा राष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च दादा असा प्रकार तेथे नसून त्यांच्या मोहिमा साधारणपणे किंवा स्थूल मानाने संघराज्यांप्रमाणे

चालतात. त्यांचे कमिशन म्हणून ओळखले जाणारे 'बोर्ड ऑफ डायरेक्टर्स' आहे आणि हे कमिशन मोहिमेचे जाळे पसरवते.

युक्ती, शक्ती आणि दाम यावर त्यांचा सारा कारभार चालतो. संघटनेतील ज्यू बुद्धीचा वापर करतात, बळाचा वापर करण्यात इटालिअन्स अग्रेसर असतात आणि पैसे खर्च करणे व अधिक मिळविणे याबाबत दोघातही सहकार्य असते. पण माफिया म्हणजे इटालिअन्स असा जनमानसाचा ठाम ग्रह झाला आहे. त्यामुळे जवळ जवळ २ कोटीहून अधिक प्रमाणात असलेल्या अमेरिकन इटालिअन्सच्या भावना दुखावल्या जातात.

पैशाचा विचार करता 'माफिया' जगातील सर्वात मोठा उद्योगसमूह ठरू शकेल. त्यांचे वार्षिक उत्पन्न ३० दशलक्ष डॉलर्सपेक्षा अधिक आहे. एकूण २४ माफिया कुटुंबाचा निव्वळ नफा. 'यु. एस्. स्टील', 'दि अमेरिकन टेलिफोन व टेलिग्राम कंपनी,' 'जनरल मोटर्स', 'स्टॅंडर्ड ऑइल', 'ऑफ न्यूजर्सी,' 'जनरल इलेक्ट्रिक', 'फोर्ड मोटर कंपनी,' आय्. बी. एम्' 'क्रायस्लर' व आर्. सी. ए.' इत्यादी सर्वात बड्या उद्योगधंद्याच्या एकत्र नफ्याइतका आहे.

माफियाच्या कार्यपद्धतीतील महत्त्वाचा भाग म्हणजे पडेल त्या किंमतीत नाहीतर जबरदस्तीने कायद्यापासून स्वातंत्र्य मिळवायचे. उद्योगधंद्यांचे सारे नियम धुडकावून लावायचे आणि इप्सित साध्य करायचे. जुगारांवर व जुगारात पैसे कमवायचे, मादक द्रव्यांचा अनिर्बंध व्यापार, जबर व्याजाने पैसे देणे आणि यातून प्रचंड नफा मिळविणे या काही महत्त्वाच्या कारवायातून ते हे सर्व साध्य करतात.

राजकारणी व पोलीस यांच्या सहकार्याने ते त्यांच्या कारवाया पार पाडतात. मिसिसिपीच्या पूर्वेकडील काही थोडी शहरे सोडली तर बाकी सर्व मोठ्या शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थांतील लोकनियुक्त कारभारी लाचलुचपतीत पार बुडालेले आहेत. नुसत्या न्यूयार्कचे उदाहरण पहा. तेथील एका माफिओसीच्या (माफियातील ठक) म्हणण्याप्रमाणे गेल्या वर्षी दरमहा १२ हजार डॉलर्स एवढी रक्कम तेथील बड्या पोलीस अधिकाऱ्यांना लाच म्हणून देण्यात आली. थॉमस नावाच्या एक माफिया बॉसने गेल्या वर्षीच्या वसंतऋतूत पश्चिम किनाऱ्यावर सुट्टी घालविली तेव्हा न्यूयार्कच्या एका डिटेक्टीव्हला स्वतःचा शरीररक्षक म्हणून नेले होते.

इलिनॉइस राज्याच्या विधिमंडळात सुमारे १५ सदस्य माफियाच्या वर्चस्वाखाली आहेत. त्यांच्या माफियाच्या संबंधाबाबत बोलायला विशेष कोणी तयार नसते. त्यांच्याकडून अब्रूनुकसानीचा खटला गुदरला जाऊ नये म्हणून त्यांना 'वेस्ट साईड ब्लाक' या सोवळ्या नावाने संबोधण्यात येते. अनेक वेळा गुन्हे विरोधक

विधेयकांना तेथील विधिमंडळात विरोध केला जातो.

माफियाच्या कारवायांची खबर देणाऱ्या माणसाला पोलीस संरक्षण मिळते काय ? अशा माणसाला लाचखोर पोलीस कसले संरक्षण देणार ? तो मृत्यूदंडाच्या शिक्षेला पात्र ठरतो. माफियाची चौकशी करण्याकरिता नेमलेला केन नावाचा एक पोलीस अधिकारी माफियाऐवजी एफ्.बी. आय्. ला खबर कोणी दिली याचीच चौकशी करीत असताना सापडला. केन आता तुरुंगात शिक्षा भोगीत आहे.

कोलंबस येथील जुगारी अड्ड्यांची चौकशी करायला आलेल्या संघराज्य-सरकारच्या तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना सार्वजनिक ठिकाणी मद्यपान केल्याच्या आरोपावरून स्थानिक पोलिसांनी काही दिवसांपूर्वी अटक केली होती. ते पोलीस होते माफियाच्या पे रोलवर. यात गुंतलेल्या आठ पोलिसांना कामावरून दूर करण्यात आले. त्यांच्यावर माफियाकडून दरमहा ८ हजार डॉलर्स घेतल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. अमेरिकन काँग्रेस (संसद)मधील २५ सदस्यांचे माफियाबरोबर संबंध असावेत असा अंदाज करणारा काही पुरावा अमेरिकेतील काही लोकांच्या हाती आहे. सुप्रसिद्ध अमेरिकन पाक्षिक लाईफने, न्यूजर्सी येथून काँग्रेसच्या प्रतिनिधीगृहावर निवडून आलेल्या गॅलधर नावाच्या सदस्याचे न्यूजर्सी येथील माफिया बॉस झिकारेलीबरोबर जवळचे संबंध असल्याचे उघड केले. गॅल-धरने याचा इन्कार केला पण लाईफवर खटला भरण्यास मात्र तो धजावला नाही. एवढे होऊनही तो पुन: प्रतिनिधीगृहावर न्यूजर्सीहून निवडून आला. एवढेच नव्हे तर माफियावर पाळत ठेवणाऱ्या एका सरकारी समितीचा तो सदस्य आहे. न्याय-पालिका यापासून अलिप्त आहे काय ? छे हो, काही न्यायधीशही माफियाच्या पे रोलवर आहेत. आणि माफियासंबंधी खटल्यांचे त्या न्यायधीशांनी कसे 'निकाल' द्यावेत याबद्दल त्यांना माफियाकडून सविस्तर सूचना मिळतात.

बेटींगमधील त्यांची गुंतवणूकही महत्त्वाची आहे. अमेरिकेत बेकायदेशीररीत्या चालणाऱ्या व माफियातर्फे चालविल्या जाणाऱ्या बेटींगमध्ये दरवर्षी २० दशलक्ष

---

माफियाचा शब्दश: अर्थ होतो बडेजाव किंवा आढ्यतेखोरपणे वागणारा. पण बहुधा हा शब्द सिसिलीयन असावा. ज्याचा अर्थ सौंदर्य किंवा अभिमान असा आहे. पण गुन्हेगारीच्या संदर्भात जुन्या सिसिलीयन 'ल कोसा नोस्त्रा'शी याचा संबंध अजून संघटित गुन्हेगारी असा अभिप्रेत आहे.

माफियाच्या एकूण २४ 'कुटुंबांपैकी' नऊ दादा-'बॉसेस' महत्त्वाचे मानले जातात. त्यापैकी गाम्बिनी, कार्टेना, कोलंबो, मार्सेलो, डेलुसिया महत्त्वाचे आहेत. पूर्व अमेरिकेच्या किनारपट्टीकडे म्हणजे न्यूयार्क, बोस्टन आदी ठिकाणी माफियाचे जबरदस्त वर्चस्व आहे.

---

डॉलर्सची उलाढाल होते. मियामी येथील गिल बेकले (बुकींचा बँकर) याला जेव्हा एफ्. बी. आय्. ने अटक केली तेव्हा नुसत्या एका दिवसात त्याने २,५०,००० डॉलर्स एवढी उलाढाल केली होती. बेकायदेशीररीत्या बेटींग घेण्याबद्दलच्या त्याच्या गुन्ह्याबद्दल तो दहा वर्षांची शिक्षा भोगीत आहे.

पैशात लोळणाऱ्या अमेरिकन माणसांना खेळाच्या मैदानाचेही खूपच आकर्षण आहे आणि हात लावू त्याचे सोने करू अशा रीतीने सर्वत्र पहाणाऱ्या माफिया कुटुंबांना ही पर्वणी न ठरती तरच नवल. बास्केट बॉल आणि फूट बॉल हे अमेरिकन्सचे आवडते खेळ. माफिया एजन्टस्ना पैसा देणाऱ्या खेळाडूंना प्रतिपक्षातील खेळाडूंच्या विकपॉइन्टस्बद्दल माहिती मिळते. काही वेळा खेळांचे निकाल (खेळ होण्यापूर्वीच) माफिया एजन्टस् लावतात.

माफियातर्फे (एजन्टस्मार्फत) पैसे कर्जाऊ दिले जातात. सोमवारी गरजूने पैसे घ्यावेत आणि शनिवारी व्याजासह परत करावेत अशी सर्वसाधारणपणे योजना असते. उदा. सोमवारी माफियाकडून ५ डॉलर्स घ्यायचे आणि शनिवारी ६ डॉलर्स परत करायचे. म्हणजेच व्याजाचा दर आठवड्याला २० टक्के. काही वेळा छोटे मोठे उद्योगपती माफियाकडून कर्जाऊ रक्कम घेतात आणि अनेक वेळ ते ती रक्कम परत करू शकत नाहीत. अशा वेळी कायदेशीररीत्या तो उद्योग माफियाच्या हाती जातो. दिवसेंदिवस हे प्रमाण वाढत आहे. न्यूयार्कचे वॉटर कमिशनर जेम्स मारक्युस यांनी वार्षिक १०४ टक्के दराने माफियाकडून रक्कम मिळविली (काही बिझनेस डिलसाठी) मारक्युस महाशय ही रक्कम परत करू शकले नाहीत. अर्थातच ते माफियाच्या हातचे बाहुले बनले आणि मग न्यूयार्कमधील निरनिराळ्या योजनांमध्ये त्यांच्या साह्याने माफिया आपले हात धुवून घेऊ लागले. मोठ्या पदांवर असलेली अनेक मंडळी त्यांच्या (बद) कर्माने माफियाच्या जाळ्यात फसतात आणि सरकारचा प्रचंड पैसा तर माफियाच्या खिशात घालतातच पण अनेक सरकारी गुपीतेही अशा रीतीने सहजपणे माफियाच्या हाती पडतात.

---

माफियाचे सदस्यत्व कोणाला प्राप्त होते—माफियाचा सदस्य होऊ इच्छिणारा इटालियन किंवा इटालियन वंशापैकी असावा लागतो. १९५२ सालापर्यंत त्याच्या खाती काही खून जमा झालेले असणे हे त्याच्या सदस्यत्वाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले जात असे. पण आता हा नियम बदलण्यात आला आहे. आता जास्तीत जास्त तरुण असणाऱ्याला वाव देण्यात येतो. पण याबाबत माफियातील म्हातारे नाराज आहेत. त्यांच्यामते अनेक लोकांना किंचाळायला लावलेल्या वा खून पचविलेल्यानांच सदस्यत्व मिळावे. याबाबत एका जुन्या माफिओसीचे पुढील उद्‌गार पहा—'आज आमच्याकडे हजारो गडी आहेत, लेकाच्यांनी एक अंडेही फोडलेले नाही आतापर्यंत.'

---

हिप्पीं ही जात अमेरिकेत वाढू लागली तसे आणि एका क्षेत्रात माफियाला सोनियाचे दिवस आले, ते क्षेत्र मादक द्रव्याचे. हॅशिश व हेरॉइन आदी मादक द्रव्यांना हिप्पींकडून प्रचंड मागणी येऊ लागली. माफियाची ह्या धंद्यातील गुंतवणूक वाढू लागली. सालिना ३५० दशलक्ष डॉलर्स (त्यात २५ दशलक्ष डॉलर्स निव्वळ नफा) एवढी प्रचंड उलाढाल फक्त मादकद्रव्यामुळे माफिया कुटुंबे करू लागली. तुर्कस्थानातून न्यूयार्ककडे येणाऱ्या एक किलो हेरॉइनला २,२५,००० डॉलर्स पडतात.

अनेक 'उद्योगां'शी संबंध असलेली माफिया कुटुंबे कामगार चळवळीपासून वेगळी कशी राहू शकतील? छोटया छोटया उद्योग व्यावसायीकांना माफियाचे सदस्य भेटतात आणि त्याच्याकडे काम करणाऱ्या दहा-बारा कामगारांच्या 'युनियन'चे ते नेते असल्याचे मालकांना सांगतात. बिचाऱ्या कामगारांना याची पुसटशीही कल्पना नसते. मालक बापडे कामगारांच्या 'युनियन'ला महिन्याचे सदस्य शुल्क देत असतात. याचा काही वेळा माफियाप्रमाणे मालकांनाही उपयोग होतो आणि ते माफियाच्या जोरावर औद्योगिक शांतता टिकवतात.

कर्जाऊ रक्कम घेणाऱ्या उद्योगपतींची अवस्था जेम्स मारक्युससारखी होतेच पण एकदा का एखादा व्यवसाय वा उद्योग माफियाच्या हाती गेला की त्यांचे 'रॅकेट' काम करू लागते आणि माफियाच्या हाती असलेल्या उद्योगातूनच दुसऱ्या उद्योगांनी कच्चा वा पक्का माल खरेदी करावा अशी सक्ती केली जाते. मालाचा दर्जा मग कसाही असला तरी त्या बापड्यांना तो खरेदी करावाच लागतो.

माफियाच्या हाती असलेला दुसरा एक महत्त्वाचा उद्योग म्हणजे विमानतळाकडे मालवाहतूक करणाऱ्या ट्रक्सचा व्यवसाय. ह्या व्यवसायात माफियाचे हितसंबंध इतके प्रचंड आहेत की त्यांनी ठरविलेच तर फारच थोड्या अवधीत जगातील प्रचंड असा न्यूयार्कचा केनेडी विमानतळ ते बंद पाडू शकतील.

माफियाकुटुंबांनी मिळविलेला प्रचंड पैसा ठेवला कुठे जातो? तो पैसा स्विस बँकांत अत्यंत सुरक्षितपणे ठेवला जातो.

माफियाचे सदस्य पैशांपेक्षा बॉस आणि सहकाऱ्यांना अधिक महत्त्व देतात, मान देतात. एखादा माफिओसी फुटून निघाला आणि पोलिसांना त्याने काही खबर देण्याचा प्रयत्न केला तर मग त्यांची धडगत नसते. एफ्. बी. आय्. च्या एका अधिकाऱ्याने एका नाईट क्लबमधील तीन माफिओसींचे संभाषण ऐकले. ते होते 'विश्वासघात' करून खबर देणाऱ्या ३५० पौंड वजनाच्या विल्यम जॅकसन नावाच्या माफिओसीसंबंधी. अंगावर शहारे आणणारे असे हे वर्णन.

माफिओसी जेम्स–'विल्यमला आम्ही सोललेले बोकड अडकवितात त्या हुकाला टांगून छळ करून ठार केले. तीन दिवस तो त्यावर लोंबकळत होता!'

दुसरा माफिओसी बुस्सेरी (खिदखिदत) 'जॅकी तू त्याला पाहिला पाहिजे होतास, अरे हत्तीसारखा होता गडी. त्याच्या वजनाने हूक वाकला. हुकावर असताना

जिमी त्याला इलेक्ट्रिक करंट असलेल्या रॉडने हाणीत होता.'

जेम्स–'अरे जॅकी, विल्यम त्या हूकवर टांगलेला, आणि आम्ही इलेक्ट्रिक रॉड चांगला चार्ज होण्यासाठी त्याच्या अंगावर पाणी उडवित होतो. बिच्चारा कोकलत होता.'

आपले रक्त थिजवून टाकणारे हे वर्णन. त्यांच्या अशाच प्रकारच्या इतर भयानक शिक्षांची आपल्याला यावरून कल्पना येईल.

हे सर्व जवळ जवळ उघडपणे चालू असते आणि कायदा काय करतो? कुठे असतो कायदा? त्यांची जबरदस्त संघटना, शिस्तबद्ध काम याहीपलीकडे पोलीस, मुलकी अधिकारी, राजकारणी, संसद सदस्य एवढेच नव्हे तर न्यायाधीश, यांना लाचखोर बनविण्याची त्यांची ताकद या जोरावर हे सर्व घडत असते. हे जर थांबविता आले तर एका वर्षाच्या आत 'ल कोसा नोस्त्रा' उर्फ माफियाचा समूळ नायनाट करता येईल. माफियाबद्दल लास वेगास येथून अमेरिकेच्या ॲटर्नी जनरलला (कायदा मंत्री) पाठविलेल्या अत्यंत गुप्त अहवालाची प्रत तीन दिवसांच्या आत माफियाच्या हाती पडली यापेक्षा अधिक बोलका पुरावा काय पाहिजे? यापलीकडेही दुसऱ्या काही गोष्टींमुळे याला आळा घालणे शक्य होत नाही. त्या म्हणजे सर्व साधनांनी सज्ज असणाऱ्या त्याचप्रमाणे बुद्धी व पैशांची जोड असणाऱ्या माफियाशी झुंज देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोई राज्ये व

---


एखादा तरुण माफियाचा सदस्य होण्याकरिता येतो तेव्हा पुढील प्रमाणे सोहळा होतो. टोळीतील कोणीतरी जुना माणूस नव्या माणसाला बॉसकडे घेऊन येतो. तत्पूर्वी त्याची पूर्ण चौकशी झालेली असते. मग मध्ययुगीन पद्धतीने सोहळ्याचा थाट केला जातो. टेबलावर पिस्तूल व सुरा ठेवला जातो. बॉस पिस्तूल उचलतो आणि पुढील अर्थाचे सिसिलीयन वाक्य उच्चारतो 'आम्ही ल कोसा नोस्त्राचे प्रतिनिधित्व करतो. ते आमचे कुटुंब आहे.' त्यानंतर ज्याने नव्या माणसाला आणलेले असते त्याचे व नव्या माणसाचे मधले बोट त्या पिस्तुलाच्या ट्रिगरमध्ये एकत्र घातले जाते. माफिया कुटुंबातील एकत्र असल्याचे हे चिन्ह समजले जाते. त्यानंतर त्याला त्याचा धर्म, देश, बायकामुले, यापेक्षा माफिया कुटुंब महत्त्वाचे मानावे लागते. व तशी शपथ घ्यावी लागते. हे सर्व पार पडताच त्याच्या हातात एखाद्या संताचे चित्र देण्यात येते व नंतर ते पेटविण्यात येते. ते चित्र जळत असताना त्याला शपथ घ्यावी लागते, 'मी माफियाच्या कायद्यांचे उल्लंघन केले व शपथ मोडली तर मलाही या कपटचाप्रमाणे जाळण्यात यावे.'

---

शहरातील पोलिसांकडे नाहीत.

पण आता अमेरिका खडबडून जागी झाली आहे. संघटित गुन्हेगारीविरुद्ध कायदे पुढे येत आहेत. पोलिसांनाही सुसज्ज करण्याचे प्रयत्न होत आहेत, माफियाच्या सुमारे २९० महत्त्वाच्या सदस्यांबद्दलची संपूर्ण माहिती एफ्. बी. आय्. ने जमा केली असून १४७ जणांवर खटले चालू आहेत यापैकी बरीच माहिती टेलिफोन्स टॅप करून व ' इलेक्ट्रानिक बग ' यांचा वापर करून मिळविण्यात आली. पण महत्त्वाची गोष्ट कोणती असेल तर लोकमानसात बदल घडविणे आवश्यक आहे ही. अजूनही अमेरिकेत अशा गोष्टींबद्दलची लोकांची सहनशक्ती अचाट आहे किंबहुना या प्रकारच्या ' धाडसां 'बद्दल अमेरिकेतील लोकांना कौतुक वाटते. खूप वेळा माफियाला लोकाश्रयही मिळतो. हे बदलल्याशिवाय माफियाला परिणामकारक आळा कसा बसणार. पण या बदलाची चिन्हे दिसू लागली आहेत. कदाचित काही वर्षांनी ' माफिया ' म्हणजे एक पुराण कथा होईल.

□ □ □



# प्रमिलाराजे

**महावीर जोंधळे**

टेलिफोनची घंटा अद्यापही खणखणत नव्हती. अप्पासाहेब तेथे जवळच बसून होते. त्यांचे कान आणि नजर टेलिफोनवर खिळलेली होती. त्या काळ्या वस्तूशी ते जणू एकरूप झाले होते. टेलिफोनवरून कळणाऱ्या बातमीची त्यांना उत्सुकता लागली होती. ते अतिशय अधीर झाले होते, पण घंटा अजूनही वाजत नव्हती... आणि त्यांच्या मनात भद्र–अभद्र कल्पनांची रस्सीखेच चालू झाली. अप्पासाहेबांना तो दिवस आठवला...ज्यावेळी काहीसा घुटमळत काहीसा लाजत त्यांचा संजय त्यांना सांगत होता;

"अप्पा...अप्पा मी विवाहबद्ध होऊ इच्छितो..."

"अरे वा! आनंदाची गोष्ट आहे ... मी आजच सुरूवात करतो वधू-संशोधनाला..."

संजयच्या प्रेमप्रकरणाची कुणकुण लागली असूनही आप्पासाहेब मुद्दामच हसत हसत म्हणाले.

"नको नको...मी तिला लग्नाचं वचन... "

घाईघाईने पण अर्धवटच संजय बडबडला. त्यावर अप्पासाहेब म्हणाले,

"असं ?... बरं झालं आमचा त्रास वाचला. पण काय रे, कोण आहे ती भाग्यवती. . .आमची सूनबाई. . .कळू दे तरी—आम्हाला "

"हो. . .हो. . .जरूर. आज संध्याकाळीच घेऊन येणार आहे तिला. असे अधीरतेने म्हणत संजय बाहेर निघून गेला. अप्पासाहेब त्याच्याकडे पहात होते.

संजयची आई वारली तेव्हा तो तेरा वर्षाचा होता. पत्नीच्या माघारी अप्पासाहेबांनी त्याला फार काळजीपूर्वक वाढविले होते. त्याची प्रत्येक इच्छा पुरी केली होती. त्याचे मन कधीही– दुखावले नव्हते. संजयनेही वडिलांच्या अशा वागण्याचा कधीच गैरफायदा घेतला नाही. उत्तम प्रकृती, सालस स्वभाव, इतरांबद्दल योग्य



आदरभाव आणि अभ्यासात हुशार असा संजयचा त्याच्या निकटवर्तीयात लौकिक होता. कमवता झाल्यावर, आपल्या वडिलांचे मन एवढेही दुखवायचे नाही अशाच निश्चयाने तो वागू लागला. आपण लग्न करायला निघालो आहोत हे अप्पासाहेबांना आवडेल याबद्दल त्याला शंका वाटत नव्हती. पण इतक्या सहजासहजी जे आपल्या भावी पत्नीला पहायला तयार होतील असे त्याला वाटले नव्हते. या उलट अप्पासाहेबांना जेव्हा कळाले की कुणा एका तरुणीबरोबर संजय बोलू फिरू लागलाय...त्याच वेळी त्याला पसंत असल्यास विवाह उरकून घ्यायचा असे त्यांनी ठरविले होते...या घरात सुहासिनीची पावले जेवढ्या लवकर उमटू लागतील तेवढ्या लवकर त्यांनाही ती हवी होती. म्हणूनच संजयने विचारताच त्यांनी मुलीला घेऊन येण्यास सांगितले होते.

संध्याकाळी लगबगीने नि हसतच संजय आला. बरोबर एका तरुण मुलीला

घेऊन. त्या तरुणीने अप्पासाहेबांना नमस्कार केला आणि ती खाली बसली. तिने आपली मान किंचित वर करून अप्पासाहेबांकडे दृष्टी टाकली. तिचा चेहरा दिसताच अप्पासाहेब जरा चकितच झाले आणि स्वत:शीच पुटपुटले.

"कुठंतरी पाहिली आहे...हाच चेहरा...हीच अंगकाठी...असेच डोळे...

"अप्पा तुम्ही ओळखता हिला ?" संजयने विचारले.

"नाही...ओळखत नाही पण चेहरा पाहिल्यासारखा वाटतोय्. ही त्या देशमुखांची मुलगी. T.Y.B.A. ला आहे. देशमुखांना आणखीही तीन मुली आहेत. पण त्या हिच्या सावत्र बहिणी...देशमुख एका कंपनीचे...

संजयच्या बोलण्याकडे अप्पासाहेबांचे लक्ष नव्हते. समोर दिसणाऱ्या चेहऱ्याचा शोध घेण्याच्या प्रयत्नात त्यांचे मन गुंतले होते.

"माझी आई लहानपणीच वारली...मला आठवतदेखील नाही. तिच्या अतिशय गोड आणि सावकाश उमटणाऱ्या आवाजाने अप्पासाहेब पुन्हा एकदा चकित झाले आणि म्हणाले, आवाजही तसाच वाटतो. बोलण्याची पद्धत..."

क्षणभर थांबून त्यांनी त्या मुलीला विचारले,

"तुझ्या आईचं नाव प्रमिला राजे होतं का ?"

"अं...अं...हो...माझ्या मामाचं आडनाव राजेच आहे." ती उत्तरली.

"हो...दोन भाऊ...एक अरविंद...दुसरा सुनिल."

"म्हणजे ? तुम्ही ओळखता मामांना ? तिने आश्चर्याने विचारले."

"तुला न आठवणारी तुझी आई नि तुझे मामा दोघेही परिचयाचे आहेत..."

"अप्पासाहेब...माझी काळजी मिटली. माझी भावी पत्नी तुमच्या ओळखीची निघाली...आता मी निश्चित झालो. संजयने ऐसपैस बसत उद्‌गार काढले.

संजय आणि ती निघून गेल्यावर अप्पासाहेब स्वत:च्या विचारात मग्न झाले. त्यांच्या मुलाची वाग्दत्त वधू व त्यांची सून म्हणून आज त्यांच्याकडे आलेली मुलगी, प्रमिला राजे या त्यांच्या एकेकाळीच्या विद्यार्थीनीचीच कन्या होती. दिसायला अगदी प्रमिला राजेसारखी. आवाजही तसाच. एफ. वाय. च्या वर्गातील प्रमिला राजे अप्पासाहेबांच्या चांगली आठवणीत होती. प्रमिला राजेचं व्यक्तिमत्वच आगळं होतं, देखणी, सडसडीत देहाची. हुशार पण शांत, अभिमानीही. देखावा नाही आणि जिज्ञासा कमालीची. दीड तपापूर्वीच्या त्या घटना पण ते सारे प्रसंग आताच घडले आहेत असे त्यांना वाटू लागले...

...एकदा तास संपल्यावर प्रमिला राजे त्यांच्याकडे आली. काही समजले नसेल म्हणून ती आली आसावी असा तर्क अप्पासाहेबांनी केला. पण ती विचारणा करीत होती त्या फिनिक्स पक्षाची. एका संदर्भात सांगितलेल्या दंतकथेची. फिनिक्स पक्षी काही ठराविक काळानंतर स्वत:लाच जाळून घेतो आणि त्याच राखेतून पुन्हा जन्माला येतो. या दंतकथेचे तिला नवल वाटत होते.

"खरंच का असा पक्षी आहे ? आणि राखेतून कसा बाई पुन्हा पुन्हा जन्म घेतो, असं ती पुन्हा पुन्हा विचारत होती. तिच्या सुंदर चेहऱ्याकडे, सावकाश आणि गोड बोलण्याकडे बारकाईने लक्ष देत अप्पासाहेब तिला समजावून सांगत होते."

अप्पासाहेबांशी प्रमिला अधून मधून बोलत असे. तेही तिच्याकडे जाणीवपूर्वक पहात असत. वरून ते दाखवित नसले तरी प्रमिलेबद्दलचे आकर्षण त्यांच्या मनात रुजले होते. म्हणून त्यानंतर थोड्याच दिवसांनी जेव्हा तिच्या लग्नाची पत्रिका त्यांच्या हातात पडली त्यावेळी त्यांना कारण नसताना खटकले. लग्न झाल्यावर प्रमिला कॉलेजात येणं बंद करील अशी त्यांची कल्पना होती. पण पुढे निसर्गानेच तिचे येणे बंद केले. तिला लवकर दिवस गेले आणि थोड्याच दिवसात तिने कॉलेज सोडले. तरीपण अप्पासाहेबांना तिची मधून मधून आठवण येत होती. तिचे भाऊ ज्या ज्या वेळी भेटत त्या त्या वेळी ते तिची चौकशी करीत. मधूनच त्यांच्या मनात प्रश्न उद्भवे या मुलीबद्दल आपणाला आकर्षण का ? पण या प्रश्नाचे उत्तर त्यांनाही कधी सापडले नव्हते आणि अशा अवस्थेतच त्यांना दुःखदायक बातमी समजली. प्रमिला बाळंतपणात दगावली. त्यांना धक्काच बसला.

तिला मुलगी झाली होती. ती चांगली होती. पण प्रमिला मात्र इहलोक सोडून गेली होती. अप्पासाहेबांना अतिशय वाईट वाटले. एका मित्राला घेऊन ते तिच्या माहेरी जाऊन आले. तिची नाजूक कोवळी कन्या खेळताना पाहून त्यांना एका प्रसंगाची आठवण झाली...प्रमिलेने चौकशी केलेल्या फिनिक्स पक्षाची. स्वतःचे जीवन स्वतःच संपवून राखेतून पुन्हा जन्म घेणारा पक्षी. अप्पासाहेबांना वाटले, त्या पक्षासारखीच प्रमिलेची स्थिती झाली. एका प्रमिलेने जीवन यात्रा संपविली... दुसरी प्रमिला जन्माला आली...फिनिक्स...फिनिक्स...अप्पासाहेबांना पुढे किती तरी दिवस त्या पक्षाची...आणि प्रमिलेची आठवण होत राहिली.

...त्या प्रमिलेची ही मुलगी...त्यांची सून. प्रमिलेसारखीच दिसणारी, तशाच आवाजाची, जणू दुसरी प्रमिलाच...आश्चर्यजनक सारखेपणा...हा सारखेपणा सगळ्याच बाबतीत...एक अभद्र कल्पना अप्पासाहेबांच्या मनाला चाटून गेली... प्रमिले सारखीच दिसणारी ही तिची मुलगीही...अप्पासाहेब दचकले. काय ही भयंकर कल्पना. स्वतःच्या मुलाच्या भावी पत्नीबद्दल...पण प्रयत्न करूनही ती कल्पना त्यांच्या मनातून निघून गेली नाही.

संजयचे लग्न ठरले. अप्पासाहेबांनी सर्व गोष्टी या दोघा पति-पत्नीच्या मना-सारख्या केल्या पण सुरवातीला जो उत्साह त्यांनी दाखविला होता तो राहिला नाही. मधूनच ते गंभीर आणि क्वचित नाराज होत. संजयच्या प्रथम लक्षात आलं नाही. पण नंतर अप्पासाहेबांच्या वागण्यात काही तरी फरक झाला की काय अशी त्याला शंका येऊ लागली. त्यांच्या अलिप्तपणा हळूहळू वाढू लागला. आपल्या सूनेला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची ते काळजी घेत. तिच्याशी बोल-ण्याचे प्रसंग ते टाळीत. त्यांना कशातही रस, उत्साह वाटत नसल्याचे आता दोघां-

नाही कळून चुकले. पण याचे कारण लक्षात येईना. विचारण्याचे धाडस दोघानांही होईना. अप्पासाहेबांना मात्र प्रमिलेची आणि तिच्या मृत्यूची घटना सारखी स्मरत होती. त्यांच्या मनाला तोच चाळा लागला होता. अशासारख्या घटना यापूर्वी घडल्याचे दाखले त्यांना समजू लागले होते. धूर्तपणे मुद्दाम चौकशी करून एखाद्या माणसाकडून अशा घटनांच्या हकीगती ऐकण्याची विचित्र हाव त्यांच्या मनात निर्माण झाली होती. याला कारण तसेच महत्त्वाचे झाले होते. प्रमिलेप्रमाणे लग्नानंतर चारच महिन्यांनी तिच्या मुलीला...त्यांच्या सुनेलाही दिवस गेले होते. त्यांच्या मनात याच विचाराची गर्दी जमा झाली होती. इतकी त्यांनी आपल्या सूनेच्या मृत्यू अकारण चिंतण्यास सुरुवात केली. ' ती बाळंत झाली. तिला मुलगी झाली. अगदी तशीच...जशी प्रमिलेला झाली होती...अन, मुलीला जन्म देऊन... अशी चित्रे ते पाहू लागले. सूनेला महिने भरत आले होते आणि स्वतः संजय आनंदात होता...

...पण अप्पासाहेब मात्र एक वाईट घटना जवळ जवळ येत चालली आहे असेच समजत होते.

दिवस जात होते. अप्पासाहेब अधिक अबोल, काहीसे तिरसट होऊ लागले. त्यांच्या अशा वागण्याने संजयला राग येऊ लागला. आपलं लग्न त्यांना पसंत नाही म्हणूनच ते असे वागतात असा त्याचा ग्रह बनू लागला अप्पासाहेबांचा—अलिप्तपणा कधी सहन न झाला तर तो त्यांना ऐकू जाईल अशा आवाजात " त्यांना पसंत नव्हतं तर स्पष्ट सांगायचं होते. नसते केले मी लग्न. " असे बोलू लागला.

अप्पासाहेब हे ऐकून गप्प बसत होते. त्याच त्याच घटनेचे चर्वितचर्वण करीत होते. अप्पासाहेब अखेरच्या क्षणापर्यंत शांत होते...

—सुनेची दवाखान्यात रवानगी झाली. ती गेल्यापासून अप्पासाहेबांच्या मनात विचाराच्या मुंग्याचे वारुळ जोम धरीत होते. त्यांच्या समोर दिसत होती...प्रमिलाराजे...तो फिनिक्स पक्षी...प्रमिला राजे...तिची आकृती...लांबसडक केस... गौरवर्ण...घारे डोळे...अन् तो राखेतून जन्मणारा फिनिक्स पक्षी...

टेलिफोनजवळ जाऊन बसत, उठत, पुन्हा बसत, पुन्हा उठत,...येरझाऱ्या... मधूनच वर बघणं...छताकडे निराळ्या कटाक्षाने पहाणे...पावलाचा वेग वाढवून चालणं...अखेर सारेच थांबवून अप्पासाहेब टेलिफोनजवळ येऊन बसले.

टेलिफोन अद्यापही खणखणत नव्हता. अप्पासाहेब जवळच बसून होते. त्यांचे कान आणि नजर टेलिफोनवर खिळलेली होती. त्या काळ्या वस्तूशी ते एकरुप झाले होते. टेलिफोनची घंटा अजूनही वाजत नव्हती...आणि त्यांच्या मनात भद्र... अभद्र कल्पनांची रस्सीखेच चालू होती.

...बेल वाजली...आप्पासाहेबानं थरथरत्या हातानं—रिसिव्हर उचलला अन् कानाला लावला " हॅलो ऽऽ मी संजय बोलतोय...कोण ? संजय ? काय...सून ऽऽ बा...ई बाळंत...मुलगा...संजय मी येतोय तिकडं. " आनंदाची एक लकेर छेडीत रिसिव्हर खाली ठेवला...समोर दिसत होती...फक्त प्रमिला राजे...त्यांची विद्यार्थीनी, दुर्दैवी प्रमिला राजे...प्रमिला राजे...

□ □ □

७ डिसेंबर १९४१
या दिवशी
जगाला एक अभूतपूर्व दृश्य पहायला
मिळाले.

चिमुकला जपान
त्याच्या तुलतेने कितीतरी
बलाढ्य, संपन्न, अमेरिका
पण पर्ल हार्बरच्या
अभेद्य अमेरिकन तळावर
अचानक हल्ला चढवून
काही तासातच अमेरिकन आरमाराची
जपानने दाणादाण उडवली.

तटस्थ अमेरिका युद्धात ओढली गेली.
आणि
याच दिवशी
दुसऱ्या महायुद्धाचा निर्णय निश्चित झाला.

पर्ल हार्बरच्या
या महत्त्वपूर्ण युद्धाची कहाणी
या अंकापासून सुरू होत आहे...



# पर्ल हार्बर

पर्ल हार्बरचे युद्ध हे दुसऱ्या महायुद्धातील एक अत्यंत महत्त्वाचे व चित्तथरारक असे प्रकरण आहे. भूमी व साधनसंपत्ती या दोन्ही बाबतीत दरिद्री असणारे एक चिमुकले राष्ट्र चिकाटी, दीर्घोद्योग, साहस व जाज्वल्य देशाभिमान यांच्या जोरावर केवढे प्रचंड कर्तृत्व गाजवू शकते याची ही साक्ष आहे !

दुसऱ्या महायुद्धकाळात मे १९४० नंतर दोस्त राष्ट्रांची सर्वत्र पीछेहाट होत राहिली. प्रशांत महासागरात जपान व युरोपमध्ये जर्मनी व इटलीने त्यांच्या तोंडचे पाणी पळविले होते. फ्रान्सच्या शरणागतिमुळे जर्मन फौजा व ब्रिटन यांच्या दरम्यान केवळ इंग्लिश खाडीचेच काय ते अंतर उरले होते ! शस्त्रास्त्रे, जहाजे

व इतर साधनसामुग्री या सर्वच गोष्टींचा भयंकर तुटवडा दोस्तांना जाणवत होता. ब्रिटन अमेरिकेचे संबंध मैत्रीचे असले तरी अमेरिकेतील अत्यंत प्रबळ असे तटस्थतेकडे झुकलेले लोकमत हा दोस्तांना तेथून मिळणाऱ्या मदतीतील फार मोठा अडथळा होता. या कठीण परिस्थितीतून अखेर त्यांच्या शत्रूनेच त्यांची सुटका केली ! १९४१ च्या अखेरीस जपानच्या पर्ल हार्बरवरील चढाईमुळे आतापर्यंत तटस्थ राहिलेले अमेरिकन राष्ट्र युद्धात ओढले गेले आणि दोस्त राष्ट्रांचे पारडे एकदम जड झाले ! दुसऱ्या महायुद्धाचा निर्णय ७ डिसेंबर १९४१ रोजीच निश्चित झाला !

पर्ल हार्बरचा विजय हा जपानी सैनिकांच्या जाज्वल्य देशाभिमानाचा, पोलादी इच्छाशक्तीचा व अभूतपूर्व साहसाचा दैदीप्यमान् अविष्कार होता यात मुळीच शंका नाही ! त्यामागे जपानी सेनापतींची अत्यंत चतुर, सूत्रबद्ध अशी योजना व सैनिकांची कित्येक महिन्यांची खडतर तपश्चर्या होती. अशा अत्यंत महत्त्वाच्या युद्धाची ही नाट्यमय हकीगत आहे !

लेखांक : एक

विनय कुबेर

## हल्ल्याची तयारी

अफाट विस्तारलेल्या, अथांग व धीरगंभीर प्रशांत महासागरातील एक काळोखी रात्र होती ती ! खोल सागरतळानजीक दाटलेल्या काळ्या कुट्ट अंधारात तीन पाणबुड्यांच्या गूढ हालचाली सुरू होत्या. सागरपृष्ठावर त्यांची चाहुल लागण्याची मुळीच शक्यता नव्हती. त्यांच्या पाठीमागे काही अंतरावर सागर पृष्ठावरून अवाढव्य युद्धसज्ज जहाजांचा एक प्रचंड ताफा शत्रूच्या दिशेने झेपावत होता ! असंख्य जहाजांच्या वेगवान् वाटचालीमुळे समुद्र घुसळून निघत होता. शंभर मैलापर्यंत विस्तारलेल्या या आरमारात विनाशिका, (Destroyers), हलक्या वेगवान युद्धनौका (Cruisers), शस्त्रसज्ज अवजड युद्धनौका (Battleships), विमानवाहू नौका (Carriers) अशा व इतर अनेक प्रकरच्या जहाजांचा समावेश होता. भूमी सोडल्यानंतर या आरमाराने आतापावेतो ३५०० मैलांचा प्रदीर्घ प्रवास केला होता. प्रशांत महासागराच्या भव्यतेत हरवून गेलेल्या या प्रचंड आरमाराची जगाला दखलही नव्हती.

विमानवाहू बोटींवर बरीच धावपळ सुरू होती. जहाजावरील उड्डाणमार्गावर बाँबफेकी व लढाऊ विमाने (Bombers, Fighter) आकाशात झेपावण्यासाठी सज्ज झाली होती. या विमानांची काळजी घेणाऱ्या तंत्रज्ञांची धावपळ चालली होती. इंजिने, रेडिओ सेट्स, पेट्रोलच्या टाक्या व चाकांच्या रबरी धावा यांची कसून तपासणी घेतली जात होती. अंधारात सुरु असलेल्या या धावपळीमुळे वातावरण गूढ बनले होते.

लढाऊ विमानांच्या मशिनगन्समध्ये काडतुसांच्या माळा शत्रूच्या काळजाचा वेध घेण्यासाठी आतुर झाल्या होत्या. तोफांमध्ये बाँबगोळे व टारपेडो बसविले जात होते. या कामगिरीत गुंग झालेल्या एका सैनिकाच्या गंभीर चेहऱ्यावर एकाएकी हास्य फुलले ! त्याच्या हातातील बाँबवर खडूने लिहिले होते, ' हा सलामीचा बाँब ! अमेरिकेला युद्धाचे आव्हान हा देईल !! '

होय ! ही सर्व तयारी अमेरिकेवर हल्ला करण्यासाठीच चालली होती ! जपानचे ' पहिले सागरी विमानदल ही कामगिरी करण्यासाठी सज्ज झाले होते ! ' ' पर्ल हार्बर ' या अभेद्य अमेरिकन नाविक तळावर गुप्त, विश्वासघातकी चढाई करून ते युद्धाला प्रारंभ करणार होते. हा एक विलक्षण व अभूतपूर्व जुगार होता. विलक्षण आत्मविश्वासाने व अंतिम विजय मिळविण्याच्या कृतनिश्चयाने चिमुकले जपानी राष्ट्र हे साहस करण्यास उद्युक्त झाले होते !

ता. ७ डिसेंबर १९४१ ! दुसऱ्या महायुद्धातील एक महत्त्वपूर्ण दिवस ! प्रशांत महासागरात काळचाकुट्ट रात्रीच्या गर्भातून पहाट नुकतीच उमलू पहात होती. सागरावरील थंडगार वाऱ्याने जपानी सैनिकांच्या अंगावर शिरशिरी येत होती. पण ती वेळ थंडगार झुळुकेचा आनंद लुटण्याची नव्हती. सैनिकांच्या युद्धाभ्यासाची कसोटी काही तासातच लागणार होती. विमानाचा शेकडो तासाचा अनुभव असलेले वाकबगार वैमानिकही अशावेळी मनातून अस्वस्थ होतात ! परंतु त्यांच्या अस्वस्थतेचे कारण युद्धाची भीती हे नसते तर युद्धाबद्दलची उत्सुकता हे असते ! जपानी दलातील नवख्या तरुण वैमानिकांची अंतःकरणे मात्र भीतीनेच धडधडत होती. नुकतेच घेतलेले भात व कोऱ्या चहाचे जेवण पोटात फिरत असल्याचा भास त्यांना होत होता. युद्धातील प्रत्येकाच्या कामगिरीबद्दल त्यांना नुकत्याच अंतिम संक्षिप्त सूचना मिळाल्या होत्या. बहुतेकजण जहाजाच्या मुख्य दिवाणखान्यातील देवतेच्या छोट्या मूर्तीपुढे विनम्रभावाने प्रार्थना करून जात होते. नतर ते जहाजावरील खलाशी मित्रांचा अखेरचा निरोप घेण्यात गुंगून जात. कित्येकांच्या नशीबी या मित्रभेटी शेवटच्याच ठरणार होत्या !

वरिष्ठ सेनाधिकाऱ्यांची मनःस्थितीही सामान्य सैनिकाहून फारशी निराळी नव्हती. मोहिमेचा प्रमुख सेनापती व्हाईस अॅडमिरल नगुमो सबंध प्रवासात अस्वस्थपणे केबिनमध्ये येरझारा घालीत होता. गेल्या कित्येक रात्री त्याच्या डोळ्यांना

झोप ठाऊक नव्हती. त्याच्यावर सोपविलेली कामगिरी अत्यंत खडतर होती. ते प्रत्यक्ष काळाचे आव्हान होते.

वैमानिक हालचालींचा प्रमुख नियंत्रक कमांडर जेंडा एरवी साक्षात उत्साहमूर्ती भासे. परंतु आज अंगावरील प्रचंड जबाबदारीच्या जाणीवेने त्याचे तोंडही सुकले होते. युद्धाची ठिणगी पडण्याचा क्षण जवळ येऊन ठेपला असता मनाला भेडसावणाऱ्या शंकाकुशंकांनी त्याची झोप उडविली होती. आज त्याला त्याच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडायची होती. त्याच्या दिवसाअखेरच्या स्थानाबद्दलची दोन अत्यंत भिन्न चित्रे त्याच्या डोळ्यापुढे तरळत असली पाहिजेत. एका चित्रात तो विजयाच्या अत्युच्च शिखरावर ठाम पाय रोवून त्याच्या मायभूमीचे विजयगान उंच सुरात गात होता. दुसऱ्या चित्रात तो मावळत्या सूर्याबरोबरच दारुण पराभवाच्या खोल दरीत कोसळत होता. त्या दरीत भयाण अंधकारावाचून अन्य काहीही नव्हते. त्याच्या प्रिय मातृभूमीच्या भवितव्यासही या अंधाराने ग्रासले होते. प्रशांत महासागराच्या भव्य पटावर आज आपण आपल्या स्वदेशाच्या भवितव्याचा डाव मांडून बसलो आहो असे त्याला वाटत होते.

परंतु त्याची ही चिंताग्रस्त अवस्था फार काळ टिकली नाही. त्याला हुकमतीखालील प्रथम श्रेणीच्या वैमानिकांचे युद्धकौशल्य व बेडर वृत्ती आठवली. पर्ल हार्बर युद्धासाठी त्यांनी केलेल्या शिस्तबद्ध प्रात्यक्षिकांचा दीर्घ चित्रपट त्याच्या डोळ्यापुढून सरकरला. रणांगणावर त्याचे नेतृत्व करणाऱ्या कमांडर फुशिडाचा उमदा, निश्चयी चेहरा आठवून त्याला मोठा धीर आला. सूर्याच्या प्रखर किरणांनी दाट धुक्याचा पडदा बघता बघता विरघळवून टाकावा तशा त्याच्या शंकाकुशंका कुठल्याकुठे विरून गेल्या. जपानी वैमानिक आज त्यांच्या विलक्षण शौर्याने प्रत्यक्ष रणदेवतेलाही तोंडात बोट घालावयास लावतील असे त्याचे मन त्याला सांगू लागले.

कानठळ्या बसविणाऱ्या प्रचंड घरघरीने जेंडाची विचारसमाधी भंग पावली. दोन लांब पल्ल्याची सागरी विमाने जहाजावरून आकाशात झेपावली.

हल्ल्यापूर्वी शत्रूच्या तळाची टेहेळणी करण्यासाठी ती पर्ल बंदराच्या दिशेने निघून गेली !

धनुष्यातून एकदा सुटलेला बाण का कधी परत घेता येतो ?

## योजनेचा जनक

पर्ल हार्बरच्या अभेद्य अमेरिकन सागरतळावर छुपा हल्ला चढविण्याची कल्पना करणेही जपानी गोटात धाडस समजले जाई. परंतु जपानी आरमाराचा सर्वोच्च सेनापती अॅडमिरल यामामोटो याने ते धाडस केले होते ! या योजनेचा जनक तोच होता. या योजनेची अत्यंत गुप्तपणे काटकोर आखणी करणे, विरोधकांच्या तीव्र नापसंतीला तोंड देऊन जपानी सैन्याच्या सर्वोच्च सेनापती मंडळाच्या गळी

ती उतरविणे, सागरी विमानदलातील निवडक सैनिकांना या युद्धासाठी खडतर शिक्षण देणे व योजना तडीस नेणे यासाठी ॲडमिरल यामामोटोने स्वतःची सर्व शक्ती व प्रतिष्ठा पणास लावली होती. यामामोटोच्या विरोधकांनी त्याच्या या युद्ध व्यूहाला ‘ आत्मघातकी ’ हे विशेषण बहाल केले होते; व ती हाणून पाडण्यासाठी भगीरथ प्रयत्न केले होते ! परंतु जपानी सैन्याच्या सामर्थ्याचा साक्षात्कार जगाला व्हावा यासाठी त्याच्याकडून हे अग्निदिव्य करून घेतलेच पाहिजे या एकाच विचाराने यामामोटोला भारले होते. त्याने सर्व अडचणींवर मात करून स्वतःचे म्हणणे खरे करण्याचा कृतनिश्चय केलेला होता.

यामामाटो एक अत्यंत बुद्धिमान व चतुर रणनीतिज्ञ होता. अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात त्याने महाविद्यालयीन उच्च शिक्षण घेतले होते. वॉशिंग्टन येथील जपानी वकीलातीत त्याने काही महिने ‘ आरमारविषयक अधिकारी ’ म्हणून कामही केले होते. या सर्व कालात त्याला अमेरिकेची संपन्नता, प्रचंड औद्योगिक ताकद व अमेरिकन सैन्यदलांची अभेद्य शक्ती यांची चांगलीच कल्पना आलेली असली पाहिजे. या बलाढ्य देशाशी चिमुकल्या जपानी राष्ट्राने युद्ध पुकारावे हे एकेकाळी त्याला साफ नामंजूर होते. परंतु नियती ही चीज मोठी विचित्र असते. पर्ल हार्बरवर छुपा हल्ला करून अमेरिकेशी दोन हात करण्यास जपानी राष्ट्राला उद्युक्त करण्याचे काम यामामोटोनेच करावे असे नियतीने ठरविले होते !

१९४० च्या हिवाळ्यात यामामोटोने जपानी पंतप्रधानांना कळविले होते— “ जिंकू अथवा मरू अशा कडव्या निर्धाराने जपानने अमेरिकेशी झुंजायचे ठरविले तर प्रारंभीचे सहा महिने तरी विजयश्री जपानवर प्रसन्न राहील याबद्दल मला यत्किंचितही शंका वाटत नाही. परंतु हे युद्ध सहा महिन्यांहून अधिक काळ



लांबविणे हा जपानचा आत्मघातकीपणा ठरेल अशी माझी खात्री झाली आहे माझ्या या मताची जाणीव ठेवून जपानचे अमेरिकेशी युद्ध उद्‌भवू नये यासाठी आपण पराकाष्ठेचे प्रयत्न कराल अशी आशा मी व्यक्त करतो."

अमेरिकेशी शत्रुत्व पत्करण्याच्या कल्पनेस सक्त विरोध करणाऱ्या यामामोटोनेच अखेर स्वतःच पुढाकार घेऊन अमेरिकेला युद्धाचे आव्हान द्यावे ही त्याच्या जीवनातील सर्वात मोठी विसंगती होती. या विसंगतीचे मूळ जपानमधील त्याकाळच्या परिस्थितीत सापडते.

## त्यावेळचा जपान

जपानी राष्ट्र म्हणजे शेकडो लहान लहान बेटांचा समूह! त्याच्या पर्वतमय प्रदेशात निसर्गसौंदर्याची जरी मुक्त हस्ताने उधळण झालेली असली तरी तेथे खनिज संपत्तीची वाणच आहे. तेथे सापडणारी अत्यंत अल्प खनिज संपत्ती जपान्यांच्या महत्त्वाकांक्षी कारखानदारीला व औद्योगीकरणाला पुरी पडणे केवळ अशक्य होते. त्याकाळी जपानची दरसाल लाखोंनी वाढणारी लोकसंख्या ही जपानी राज्यकर्त्यांची आणखी एक मोठी समस्या होती. जपानी नागरिक अत्यंत उद्योगी व महत्त्वाकांक्षी असल्यामुळे ते साधनसंपत्तीविना स्वस्थ बसणे शक्य नव्हते. हजारो जपानी आसपासच्या प्रदेशात जाऊन उद्यम सुरू करीत व तेथे जपानचे प्रभुत्व स्थापन करीत. जपानी सरकार अशा प्रदेशांवर आक्रमण करण्याची संधी साधण्यास टपून बसलेले असे. जपानी विस्तारवादाने पूर्वेकडील वातावरण भयग्रस्त करून सोडले होते. १९१० मध्ये कोरिया, १९३१ मध्ये मांचुरिया तर १९३७ मध्ये खुद्द चीनमध्ये जपानी सैन्याने आक्रमण केले. नयनमनोहर सृष्टिसौंदर्य, निरागस अकृत्रिम मानवी जीवन यामुळे 'उषःकालीन स्वप्नभूमी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोरियामध्ये युद्धाग्नी जपान्यांनीच प्रथम भडकविला! १९३७ पर्यंत या वणव्याने मांचुरिया व चीनलाही वेढले! परंतु या दोन्ही देशातील कट्टर राष्ट्रवाद्यांनी हळूहळू जपानला कडवा प्रतिकार सुरू केला. त्यामुळे १९४१ मध्ये जपानसारखा झुंजार दर्यावर्दी देशही अखेर मेटाकुटीस आला! चिनी भूमीवरील युद्धात त्याला प्रचंड हानी व जबरदस्त पराभव सोसावे लागले. दीर्घकालपर्यंत लांबलेल्या निरर्थक युद्धामुळे जपानची अर्थव्यवस्था मोडकळीस आली! विशेषतः युद्धासाठी अत्यावश्यक असणारे खनिज लोखंड व पेट्रोल याचा भयंकर तुटवडा जपानला भासू लागला. या परिस्थितीवर तातडीची उपाययोजना करणे निकडीचे होऊन बसले. या उपाययोजनेतही आणखी युद्ध भडकविण्याचा व प्रदेश बळकाविण्याचाच समावेश जपानी नेत्यांनी केला. चालू असलेले युद्ध संपविण्याचा नव्हे!

फिलिपाईन्स, मलाया व डचांच्या ताब्यातील ईस्ट इंडीज बेटे या दक्षिण भागातील संपन्न भूप्रदेशाकडे जपानची फार पूर्वीपासून नजर होती. या प्रदेशाचे जपानी साम्राज्यात विलीनीकरण करून तेथील खनिज संपत्ती लुबाडण्याची महत्त्वाकांक्षा

जपानी नेते फार काळ उराशी बाळगून होते! १९३९ मध्ये यामामोटो जपानी आरमाराचा प्रमुख बनला त्यावेळी परिस्थिती ही अशी होती. जपान्यांच्या सुप्त महत्त्वाकांक्षा जागृत होऊ लागल्या होत्या.

जनरल सुझुकी (आशियाई विकास मंडळाचा अध्यक्ष) याने ही गोष्ट एकदा स्पष्टपणे बोलून दाखविली होती. तो म्हणाला, "येत्या तीन-चार वर्षात जपानने दक्षिणेतील भूभागावर कबजा करायला हवा. त्याला आवश्यक तितके पेट्रोल अॅल्युमिनियम, निकेल व रबर उपलब्ध करून घेण्यासाठी दुसरा मार्गच नाही."

हा मार्ग सरळ धोपट नव्हता. त्यात एक मोठे आव्हान होते. दक्षिण भागात भूमीवर दोस्त राष्ट्रांचे वर्चस्व होते आणि सागरावर अमेरिकन आरमाराचा खडा पहारा होता. त्यामुळे जपानने दक्षिण मोहिमेस प्रारंभ करणे याचाच अर्थ संपन्न व बलाढ्य अमेरिकन राष्ट्राला युद्धाचे आव्हान देणे असा होत होता. हे कटु सत्य यामामोटोही जाणून होता यात शंका नाही. तरीसुद्धा त्याने असा विस्तवाशी खेळ करण्याचा निर्णय का घेतला? या प्रश्नाचे उत्तर जाणून घेण्यासाठी त्याच्या स्वभावाची दुसरी बाजू जाणून घ्यायला हवी.

यामामोटो हाडाचा जपानी देशभक्त व कट्टर राष्ट्रवादी होता. स्वतःची मातृभूमी व तिचा अधिपती यावर त्याची अपार निष्ठा होती. जपानी वंश हा एक सर्वश्रेष्ठ मानववंश आहे, त्याचे भवितव्य अत्यंत उज्वल आहे असा त्याला ठाम विश्वास वाटे. सर्व आशियाई देशांच्या जडणघडणीत व विकासात जपानला अनन्यसाधारण भूमिका पार पाडायची आहे अशी त्याची धारणा होती. तो देशकर्तव्यासाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या जपानी वंशाचा सुपुत्र होता. त्याचा आत्मविश्वासही दांडगा होता. त्यामुळेच वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून स्वदेशाच्या उत्कर्षासाठी तो हा धोका पत्करण्यास सिद्ध झाला.

जपानी साम्राज्यविस्ताराच्या स्वप्नात यामामोटोचे अधिकारपद हा महत्त्वाचा दुवा होता. तो जपानी आरमाराचा प्रमुख होता. जपानच्या दक्षिण दिग्विजय मोहिमेत अमेरिकन आरमाराचे अस्तित्व हा सर्वात मोठा अडथळा होता. दक्षिण प्रशांत महासागरातून या प्रचंड सैनिकी सामर्थ्याचा नायनाट करणे, निदान दक्षिण मोहिमेच्या प्रारंभीचे सहा महिने हे सामर्थ्य निष्प्रभ करणे ही जपानच्या यशाची पहिली पायरी होती. अर्थात त्याची जबाबदारी यामामोटोवर पडणार हे उघडच होते!

हा चमत्कार कसा घडवून आणावा हे यामामोटोला चांगले ज्ञात होते. कुशाग्र बुद्धिमत्तेचा, जुगारी व धाडसी प्रवृत्तीचा वैमानिकशास्त्र निपुण सेनापती अशी त्याची ख्याती होती. उत्कृष्ट शिक्षणामुळे त्याच्या कर्तबगारीला आगळेच तेज चढले होते. स्वतःच्या विचाराच्या पुष्टयर्थ निरनिराळी वचने उद्धृत करण्यात त्याचा हातखंडा होता! 'सिंहाची नखे कापून त्याला निष्प्रभ करायचे असेल तर त्याच्या गुहेत शिरण्याचीही तयारी हवी' हे त्याचे अत्यंत आवडते वचन होते.

## सिंहाची गुहा

प्रशांत महासागरातील हवाई बेटामधील 'पर्ल हार्बर' नाविक तळ हा अमेरिकन आरमाराच्या सामर्थ्याचा केंद्रबिंदू होता. हीच ती सिंहाची गुहा! यामामोटोचे डोळे येथेच खिळलेले होते. जपानची दक्षिण मोहिम या गुहेतील वनराजाची नखे कापून काढून मगच सुरू करायला हवी याबद्दल यामामोटोला मुळीच शंका नव्हती! संपूर्ण गुप्ततेसह जय्यत तयारी करून, गनिमी काव्याचा अवलंब केल्यास कितीही बलाढ्य शत्रूला नामोहरम करता येते हे त्याला ठाऊक होते. म्हणूनच त्याने १९४१ च्या जानेवारीपासून पर्ल हार्बर युद्धाची तयारी करण्यास प्रारंभ केला.

याबाबत त्याने त्याचा एक जिवलग मित्र अॅडमिरल ओनिशी हा जपानी आरमारातील एक नावाजलेला सागरी विमानदल-तज्ज्ञ होता. यामामोटोने एका खाजगी गुप्त पत्रात 'पर्ल हार्बर'वरील छुप्या हल्ल्याची योजना ओनिशीपुढे मांडली. त्याने स्वतःच्या कल्पनेनुसार या मोहिमेचा आराखडा मांडला व त्याच्या व्यावहारिकतेबद्दल ओनिशीचे मत विचारले. या मोहिमेत उद्भवू शकणाऱ्या अडीअडचणींवर व तीत सोडवाव्या लागणाऱ्या अनेक क्लिष्ट प्रश्नांवर विचार करण्याची सूचना त्याने ओनिशीला केली.

यामामोटोचे पत्र वाचून संपविताच ओनिशीच्या मनःचक्षूंपुढे कमांडर जेंडाची मूर्ती उभी राहिली. 'कागा' या विमानवाहू नौकेवरील वैमानिक अधिकारी कमांडर जेंडा ही या योजनेबद्दल विचारविनिमय करण्यास अत्यंत योग्य अशी व्यक्ती होती.

जपानी आरमारातील अत्यंत हुशार वैमानिक अधिकारी म्हणून कमांडर जेंडाचे नाव घेतले जाईल. सरळ नासिका, काळेभोर भेदक डोळे व निश्चयीवृत्ती दर्शविणारी निमुळती हनुवटी असा त्याचा चेहरा त्याच्या तल्लखपणाची साक्ष देई. त्याचे विचार कल्पनारम्य, नाविन्यपूर्ण व साहसी असत. जपानी सागरी विमान दलाची रचना व त्याचे युद्धतंत्र यावर जेंडाच्या कल्पनांचा जबरदस्त प्रभाव पडलेला होता.

ओनिशीने त्याला यामामोटोचे पत्र दाखविले. या पत्रात सुचविलेल्या योजनेतील नाविन्य व साहस यामुळे जेंडाच्या अंगावर रोमांच उभे राहिले! अशक्य हा शब्द त्याच्या कोषातच नव्हता. तरीसुद्धा ही मोहीम फार जोखमीची असल्याची जाणीव त्याला झाल्यावाचून राहिली नाही.

ओनिशीने यामामोटोच्या योजनेतील मुख्य मुद्द्यांचे स्पष्टीकरण देताना सांगितले, 'अमेरिकनांचे नीतीधैर्य खच्ची करण्यासाठी हल्ल्याचा मुख्य रोख युद्धनौकांवर ठेवावा असे यामामोटोचे मत आहे.'

जेंडाला हे मत पटले नाही. आरमारात युद्धनौकांचा समावेश होऊन फारच थोडा काळ लोटलेला होत. त्यांच्या सामर्थ्याची प्रचीती अजून आलेली नव्हती. परंतु कमांडर जेंडा त्यांचे सुप्त सामर्थ्य जाणून होता. 'युद्धनौका हाच नौदलाच्या

सामर्थ्याचा मुख्य कणा असतो ' अशी कित्येक जपानी व अमेरिकन अधिकाऱ्याप्रमाणेच यामामोटोचीही समजूत असल्याचे दिसत होते. साहजिकच अमेरिकन युद्धनौकांचा नाश केला म्हणजे त्यांचे सामर्थ्य खच्ची होईल असे त्याला वाटत होते. हल्ल्याचा मुख्य रोख अमेरिकनांच्या विमानवाहू नौकांवरच असायला हवा हे जेंडाचे मत त्याने स्पष्टपणे मांडले.

प्रत्यक्ष हल्ला करण्यासाठी यामामोटोने सुचविलेल्या पद्धतीही जेंडाला काहीशा चमत्कारिक वाटल्या. "जपानी विमानवाहक नौका शत्रूच्या फार नजीक नेणे धोक्याचे आहे. म्हणून विमानांनी हल्ल्यांसाठी उड्डाण केले, की ताबडतोब या नौकांनी परतीच्या प्रवासाला प्रारंभ करावा. विमानांनी हल्ल्यानंतर जहाजांवर परतूच नये. वैमानिकांनी विमानांसह समुद्रातच उतरावे व पाणबुड्यांनी त्यांची सुटका करावी. जपानी वैमानिकांचे हे अचाट साहस पाहून अमेरिकन सैन्य गर्भगळीत होईल. अशा साहसी सैतानांशी झुंजणे व्यर्थ आहे असे वाटून ते शस्त्रे खाली ठेवील !"

एकूण यामामोटोच्या कल्पना साहसी व वीरश्रीपूर्ण होत्या. परंतु त्या तितक्याच आत्मघातकीही होत्या. त्यामुळेच जेंडाने त्या अव्यवहार्य ठरविल्या. अशा आत्मघातकी हल्ल्याच्या योजनेमुळे वैमानिकांच्या मनावर अनिष्ट परिणाम झाला असता. शिवाय शत्रूच्या वर्चस्वाखालील सागरात विमाने उतरविल्यास अनेक कुशल वैमानिक व त्यांची विमाने हकनाक गमवावी लागली असती. सर्वात मोठा धोका त्यानंतरच होता. परतीच्या प्रवासात शत्रूकडून प्रतिहल्ला होण्याची शक्यता डोळ्याआड करता येत नव्हती. अशा प्रसंगी जपानी आरमाराजवळ सागरी विमानांचे संरक्षक छत्र नसल्यास शत्रूच्या विमानांनी त्याची वाटेल तशी ससेहोलपट केली असती. या आरमाराने उघड्या समुद्रातून सागरी विमानांच्या संरक्षणाविना ३५०० मैलाचा प्रदीर्घ परतीचा प्रवास करावा असे म्हणणे धाडसाचेच ठरले असते. त्यामुळे जेंडाने यामामोटोच्या या योजनेस स्पष्ट विरोध दर्शविला.

जेंडा परतला तेव्हा त्याच्या मनात नवनवीन कल्पनांची आतषबाजी सुरू होती. झटपट कामास लागून त्याने केवळ दोनच आठवड्यात नियोजित हल्ल्याचा सविस्तर आराखडा ओनिशीपुढे ठेवला !

## जेंडाची योजना

जेंडाची ही योजना खरोखरी अद्वितीय होती ! जपानी आरमारातील सर्वच्या सर्व विमानवाहू जहाजे चढाईसाठी वापरावीत असे त्याने सुचविले होते. शत्रूच्या जास्तीत जास्त निकट जाण्यासाठी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन भल्या पहाटे हल्ल्याला प्रारंभ करायचा होता. लक्ष्यावर झेप घेऊन बाँबफेक करणारी करणारी विमाने (Dive Bombers), उंचावरून बाँब टाकणारी विमाने (High

level Bombers), लढाऊ विमाने (Fighters) आणि टारपेडो फेकी विमाने (Tarpedo planes) अशा विविध प्रकारच्या विमानांचा हल्ल्यात उपयोग करायचा होता. वास्तविक पर्ल बंदरातील समुद्र बराच उथळ होता. अशा समुद्रात टारपेडोचा वापर करता येत नाही. तरीही जेंडाने बॉंबपेक्षाही टारपेडो हेच प्रमुख शस्त्र मानले होते. कारण जहाजाच्या अगदी नजीक जाऊन, अचूक व प्रभावी मारा करणे टारपेडो वापरल्याशिवाय शक्य झाले नसते. उथळ पाण्यात वापरण्यायोग्य असे खास टारपेडो जपानकडे नव्हते. परंतु आवश्यक तर असे टारपेडो शोधून काढता येतील असे जेंडाने गृहीत धरले होते.

ओनिशीने जेंडाच्या सर्वच योजनांना तत्काळ मान्यता दिली. त्यात स्वतःच्या बहुमोल सूचनांची भर घातली व मार्चच्या प्रारंभी हा विस्तृत आराखडा यामामोटोला सादर केला. जेंडा व ओनिशी या दोघांच्याही कष्टाचे व हुशारीचे यामामोटोने चीज केले. प्रत्यक्ष युद्धप्रसंगी उपयोगात आणलेली योजना या मूळ योजनेहून फारशी वेगळी नव्हती. सागरी विमानदलाने नियोजित युद्धपद्धतींचा सराव करण्यास ताबडतोब प्रारंभ केला. विविध दलातील सहा विमानवाहक नौका व त्यांचेबरोबर प्रत्येकी दोन याप्रमाणे एकूण बारा विनाशिका यांचे 'पहिले सागरी विमानदल' (First Air fleet) स्थापन करण्यात आले.

युद्धनौकांच्या श्रेष्ठत्वावर ठाम विश्वास ठेवणाऱ्या हेकट पुराणमतवादी अ‍ॅडमिरल्सनी या जमवाजमवीला तीव्र विरोध केला. पर्ल हार्बरच्या संभाव्य मोहिमेबद्दल त्यांना काडीमात्र कल्पना नव्हती. त्यांना या मोहिमेचा वास लागला असता तर त्यांची माथीच भडकली असती ! परंतु यामामोटोने पुढचामागचा काहीएक विचार न करता या मोहिमेसाठी तयारी सुरू करण्याच्या आज्ञा सोडल्या. जेंडाने तर एकाद्या व्रतस्थ साधूप्रमाणे स्वतःला वाहून घेतले. त्याच्या ध्यानी, मनी स्वप्नी, व कृतीतही 'पर्ल हार्बर' विना काहीच नव्हते !

या नव्या दलाचे नेतृत्व आपण स्वतःच करावे अशी तीव्र इच्छा यामामोटोच्या मनात होती. परंतु त्याचा तत्कालीन हुद्दा त्यापेक्षाही वरचा होता. त्यामुळे त्याची इच्छा पुरी होणे शक्य नव्हते. अनुभव व नोकरीचा काळ यांचा प्रामुख्याने विचार होऊन नेतेपदी व्हाईस अ‍ॅडमिरल नगुमो याची निवड झाली,

नगुमो सागरी युद्धतंत्रात चांगलाच प्रवीण होता. तरीसुद्धा त्याची गणना स्वतंत्र प्रज्ञा नसलेल्या सनातनी वृत्तीच्या खलाश्यातच होई. आतापर्यंतच्या दीर्घ व निष्कलंक कारकीर्दीत सागरी-वैमानिक युद्धतंत्राशी त्याचा फारच थोडा संबंध आला होता. त्याला सागरी विमानदलाच्या क्षमतेची व युद्धतंत्रांची फारशी माहिती नव्हती. पर्ल हार्बर मोहिमेच्या हालचालींमुळे तो कमालीचा अस्वस्थ झाला होता. शत्रूच्या अभेद्य किल्ल्यावर चढाई करण्याच्या उद्देशाने एवढ्या मोठ्या लवाजम्याने भर समुद्रातून केलेला ३५०० मैलांचा प्रवास शत्रूपासून लपून राहू शकेल असा

भरवसा त्याला वाटत नव्हता. या मोहिमेतील धोक्यांमुळे तो फारच नाराज होता.

इतक्या दूरवरच्या प्रवासासाठी आवश्यक असणारे तेल साठविण्याची क्षमता कोठल्याही जहाजात नव्हती. त्यामुळे प्रत्येक जहाजात मध्यंतरी एकदा तरी इंधन भरावे लागणार होते. खवळलेल्या समुद्रात हे काम अत्यंत कठीण असते. ते निश्चित वेळात पार पाडून या जहाजांना गुप्तपणे, नियोजित वेळी अचूक हवाईला पोचायचे होते ! आणि हल्ल्याचे यश तर सर्वथा त्याच्या अचानकतेवर अवलंबून होते. ठरलेल्या वेळापत्रकात काही घोटाळे झाल्यास शत्रूला या आरमाराची चाहूल लागली असती आणि अमेरिकन आरमाराकडून जपानी आरमाराचीच मारकाट झाली असती. निव्वळ एका दिवसाच्या युद्धात जपानचा संपूर्ण पराभव झाला असता ! नगुमोच्या भ्रांतचित्ताला केवळ एकाच गोष्टीचा दिलासा होता. हा साहसी बेत अजिबात रद्दच होईल अशी आशा त्याला वाटत होती. कारण युद्धाची शक्यता अजून वाटत नव्हती. जपान व अमेरिकेची वाटाघाटीची बोलणी सुरू होती. ( याबाबत जपानने अमेरिकेची व जगाची हेतूपुरस्पर फसवणूक केली. पर्ल हार्बरवर पहिला बॉंब पडेपर्यंत त्याने अमेरिकेला नाटकीपणे वाटाघाटीत गुंतवून ठेवले ! ) शिवाय या योजनेचे सूतोवाच स्वतःच करून यामामोटोने त्याच्या अधिकाराबाहेरील कृत्य केले आहे असे नगुमोला वाटत होते. अशा मोहिमांच्या सूचना करण्याचे अधिकार फक्त आरमाराच्या नौसेनापती मंडळाला होते. हे मंडळ यामामोटोच्या औद्धत्यपूर्ण सूचनेला नमणार नाही अशी नगुमोची अटकळ होती. तेव्हा उगाच गुप्त कागदपत्रांची उलथापालथ करण्याऐवजी स्वस्थ बसून राहणेच योग्य होईल असा निर्णय नगुमोने घेतला.

## ती ऐतिहासिक बैठक !

परंतु नगुमोची आशा व्यर्थ ठरणार असाच एकूण रंग दिसत होता. युद्धाच्या दिशेने जपानची वाटचाल सुरूच राहिली. जुलै अखेर जपानने फ्रेंच, इंडोचायना पूर्ण व्यापला. आशियाची ' नवी घडी ' बसविण्यास सिद्ध झालेल्या जपानी सैन्यदलांनी या देशाच्या उत्तर भागावर पूर्वीच कबजा केलेला होता. आता आणखी पुढे सरकून त्यांनी सर्वच इंडोचायना गिळंकृत केला. त्यानंतर काही दिवसातच अमेरिकन अध्यक्ष रुझवेल्ट यांनी अमेरिकेतील सर्व जपानी नागरिकांना स्थानबद्ध केल्याची घोषणा केली. अमेरिकन बंदरातून मालाची ने आण करण्यास जपानी बोटींना मनाई करण्यात आली. एक वर्षापूर्वीपासूनच जपानला खनिज लोखंडाची निर्यात करण्यास बंदी घातलेली होती. आता जपानचा पेट्रोल पुरवठाही तोडण्यात आला. ब्रिटन व नेदरलंडस् यांचे जपानशी अघोषित युद्धच सुरू होते. त्यामुळे त्यांनी हे निर्बंध पूर्वीच लागू केले होते.

हळूहळू जपानी वृत्तपत्रातून अमेरिकेशी युद्ध पुकारण्याची भाषा चालू झाली. जपानची आर्थिक नाकेबंदी करून अमेरिकेने त्याशी आर्थिक युद्धच पुकारले आहे

अशी भावना जनमानसात बळावू लागली व लष्करी युद्धासाठी लोकमताचे दडपण वाढू लागले.

राजकीय व आर्थिक क्षेत्रातील आणीबाणीच्या परिस्थितीचा विचार करण्यासाठी जपानचे राजे हिरोहितो यांनी सप्टेंबरच्या प्रारंभी प्रमुख जपानी पुढाऱ्यांची गुप्त बैठक बोलाविली. राजवाड्याच्या पूर्व भागातील एका दालनात लांबलचक चौकोनी टेबलाभोवती बसण्याची व्यवस्था करण्यात आली. राजे हिरोहितो सभेच्या अध्यक्षस्थानी उच्चासनावर विराजमान झाले.

प्रथम पंतप्रधान कोनोय बोलण्यास उभे राहिले. त्यांनी सरकारच्या परराष्ट्रीय धोरणाचे विवेचन केले. त्यांचे भाषण राजेसाहेबांनी निश्चल बसून एकाग्रतेने ऐकले.

पंतप्रधानांनी आपल्या विवेचनात सरकारचे परराष्ट्रीय धोरण थोडक्यात खालीलप्रमाणे सांगितले.

१. स्वतःचे आर्थिक हेतू साध्य करण्यासाठी ब्रिटन, अमेरिका व नेदलँडस् या राष्ट्रांविरुद्ध युद्ध पुकारण्याचा निर्णय जपानी सरकारने घेतला आहे. या युद्धाची तयारी ऑक्टोबरअखेर पूर्ण होईल.

२. वाटाघाटींच्या मार्गाने जपानच्या मागण्या मान्य व्हाव्यात यासाठी सरकार या अंतिम मुदतीपर्यंत प्रयत्नशील राहील.

वाटाघाटींच्या मार्गाने पेचप्रसंग सोडविण्याचा प्रयत्न करण्याचे जपानी पंतप्रधानांचे आश्वासन शुद्ध ढोंगीपणाचे होते. त्यांनी दोस्तांकडे इतक्या भरमसाठ मागण्या केलेल्या होत्या की, त्या पुऱ्या होणे अशक्य कोटीतील होते. तसे केल्यास दोस्तांना अतिपूर्वेकडील राजकारणातून काढता पाय घ्यावा लागला असता! अप्रत्यक्षरीत्या जपानी पंतप्रधानांना हीच गोष्ट सुचवायची होती.

सभेला उपस्थित असलेल्या सर्व प्रमुख व्यक्तींनी या प्रश्नाबाबत स्वतःचे विचार मांडले. ब्रिटनबरोबरचे शत्रुत्व आणि अमेरिकेचा व्यापारबहिष्कार यामुळे झपाट्याने संपुष्टात येणाऱ्या युद्धसामुग्रीची भरपाई करणे दिवसेंदिवस अशक्य होत चालले होते. देशातील शिलकी तेलसाठा फारच थोडा होता. तो जेमतेम वर्षभरच पुरला असता. झटपट काहीतरी हालचाल करायला हवी या मुद्यावर सर्वांचे एकमत झाले.

राजेसाहेबांचा प्रतिनिधी योशिमिची हारा हा सर्वात अखेरीस बोलला. त्याने राजेसाहेबांचे मत सांगितले, " युद्धाशिवाय तरणोपाय नाही ही गोष्ट सर्वजण गृहीत धरून चालत आहेत. वाटाघाटींना दुय्यम स्थान देण्यात येत आहे. राष्ट्रापुढील समस्या सोडविण्यासाठी इतर राष्ट्रांशी समझोता करण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले जात नाहीत असे परराष्ट्रीय धोरणावरून वाटते. "

राजेसाहेबांच्या या स्पष्टोक्तीमुळे बैठकीतील वातावरण एकदम गंभीर झाले. नौदलमंत्री अॅडमिरल कोशिरो याने मंत्रिमंडळाची बाजू सावरण्याचा प्रयत्न केला.

मंत्रिमंडळ तडजोडीच्या मार्गास दुय्यम स्थान देत नाही हे त्याने पुनः पुन्हा सांगितले. परंतु राजेसाहेबांचे समाधान झाले नाही.

स्वतःचे विचार प्रतिनिधिमार्फत मांडण्याची आजवरची प्रथा मोडून राजेसाहेब स्वतः सभेत बोलण्यास उभे राहिले तेव्हा सर्वजण थक्क झाले !

राजेसाहेबांनी त्यांचे पितामह 'राजे मिजी' यांनी रचलेली 'सागराच्या चतुःसीमा' ही कविता वाचून दाखविली. सर्वांनी श्वास रोखून ती ऐकली. निस्तब्ध शांततेत राजेसाहेबांची धीरगंभीर वाणी उमटली. 'जगातील सर्व मानवसमूह एकाच परमेश्वराची लेकरे होत अशी माझी श्रद्धा आहे. मग आज युद्धाच्या वादळी वाऱ्यांनी जगात थैमान घातलेले का दिसते ?'

राजेसाहेबांनी सभेला उद्देशून प्रश्न केला, 'आमच्या पितामहांचे जागतिक शांततेचे स्वप्न आजही का साकार होऊ शकत नाही ?'

सभेत बराच काळ स्तब्धता पसरली. काय बोलावे ते कोणासही सुचेना. शेवटी अॅडमिरल कोशिरोने शांतताभंग करण्याचे धाडस केले. त्याने आवर्जून सांगितले, "राजनैतिक व्यवहारचातुर्य वापरून तडजोडीने पेचप्रसंग सोडविता येईल याची मंत्रिमंडळाला स्पष्ट जाणीव आहे. लष्करी उपाययोजना हा सर्वात शेवटचा मार्ग आहे असेच आम्ही मानतो." पायदल प्रमुखानेही या म्हणण्यास दुजोरा दिला. परंतु राजेसाहेबांचे समाधान झाल्याचे चिन्ह काही दिसले नाही. सर्वांच्या मनावर चमत्कारिक दडपण शिल्लक असतानाच बैठक संपल्याची घोषणा करण्यात आली.

राजेसाहेबांनी पर्ल हार्बर मोहिमेस प्रगट विरोध केला असता किंवा काय याचा अंदाज करणे महाकठीण आहे. त्यांची अवस्था चमत्कारिक झाली होती. त्यांना युद्ध मनापासून नको होते. परंतु स्वतःच्या राजेपदाची प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी व देशाच्या राजकीय यंत्रणेचे ऐक्य कायम राखण्यासाठी त्यांना मंत्रिमंडळाशी सहमत होणे भाग पडले. युद्धाच्या निर्णयास त्यांनी मूक संमती दिली.

या निर्णायक क्षणी राजेसाहेबांना पर्ल हार्बरच्या नियोजित योजनेची माहिती होती किंवा नाही हा प्रश्नही अनुत्तरितच आहे. त्यामुळे त्यांनी या मोहिमेस हरकत घेतली असती असे म्हणणेही धाष्टर्याचेच ठरेल. एकदा युद्धाचा निर्णय घेतल्यावर त्याच्या अंमलबजावणीत त्यांनी कदाचित् हस्तक्षेप केला नसता ! ( क्रमशः )

(आधारित)

# एक आशादायक संध्याकाळ

गेल्या काही वर्षात खेळाच्या स्पर्धांसाठी मी महाराष्ट्राचे बहुतेक सारे जिल्हे भटकलो. देशी खेळातील बहुतेक सारे नामवत संघ, संस्था, व्यायाम शाळा बघण्याची संधी मला मिळाली. संघाच्या दर्जाचे कौतुक करत असताना क्रीडांगणा-वरच्या खेळाडूंच्या संख्येबद्दल मी नेहमीच नाराजी आणि खेद व्यक्त केला. शतक अथवा अर्धशतकांची परंपरा सांगणाऱ्या सघाच्या मैदानावर पुरे पन्नास शंभर खेळाडू दृष्टीस पडू नये याचे कारण कार्यकर्त्यांची उदासीनता असाच करता येईल. चार चांगल्या खेळाडूंच्या जीवावर जोपर्यंत संघ सामने जिंकतो आणि त्यांचा फॉर्म संपण्यापूर्वी आणि चार खेळाडू या ना त्या प्रकारे मिळवता येतात तोपर्यंत देशी खेळाचा प्रसार या महत्त्वाच्या गोष्टीकडे सारेच संघ दुर्लक्ष करतात.

शरीराला आणि मनाला ताजेपणा आणण्यासाठी स्वत:चा अभ्यास व व्यवसाय सांभाळून हे विनखर्चाचे खेळ संध्याकाळी तासभर खेळण्यास आज अनेक तरुण मने उत्सुक असतात. याशिवाय या खेळांना आज लोकमान्यता, राजमान्यता प्रसिद्धी प्राप्त झाल्यामुळे त्याचे आकर्षण आणखी वाढले आहे. दुर्दैवाने योजकस्तत्र दुर्लभः अशी आज याबाबत स्थिती आहे.

देशी खेळांच्या वाढीसाठी अत्यंत सातत्याने आणि शिस्तबद्धपणे केलेल्या प्रयत्नाचे एक दुर्लभ दर्शन मला मागील आठवड्यात साताऱ्ला आढळले. श्री शिवाजी उदय मंडळ ही संस्था सातारा जिल्ह्यातील मान्यवर क्रीडासंस्था आहे. अखिल भारतीय पातळीवर कबड्डी, खोखो, मल्लखांब, कुस्तीत चमकणारे अनेक संघ व खेळाडू या मंडळाने तयार केले आहेत. पण हे तर महाराष्ट्रातले अनेक संघ आज करतात. या मंडळाचे कौतुक यासाठी की सर्वप्रकारच्या देशी खेळाचे शिक्षण देण्या-साठी आठ शाखा सातारा शहरात यांनी चालविल्या आहेत आणि सुमारे हजार स्त्री-पुरुष नियमितपणे तेथे सराव करतात. ऐंशी हजार वस्तीच्या सातारा शहरात ही संख्या निश्चितच कौतुकास्पद आहे. अशा अनेक शाखा चालविणारी एकही क्रीडासंस्था महाराष्ट्रातील मोठ्या शहरातून मला आढळली नाही. त्यामुळे या कामाची गरज व यश अधिक जाणवते. दर तीन महिन्यांनी हे सारे खेळाडू संस्थेच्या मुख्य क्रीडांगणावर एकत्रित करून देशी खेळाच्या प्रसाराचे एक विलोभनीय दर्शन संस्था घडविते. मागील आठवड्यातच हा कार्यक्रम झाला.

सारे वातावरण कसे चैतन्याने भारले होते. ओळीने आखलेल्या कबड्डीच्या रेखीव मैदानावर दहा वर्षापासून ते तीस वर्षापर्यंतचे खेळाडू आपापल्या गटातील विरुद्ध शाखाच्या संघाशी सामने रंगवत होते. खोखोच्या मैदानावरही मुला-मुलींच्या खेळाची धावपळ चालली होती. सारे नियोजन क्रीडामहोत्सवाएवढेच शिस्तबद्ध होते. सर्व सामने एकाच शिट्टीच्या इशाऱ्यावर चालू होत आणि संपत. धावणे, उंच उडी, लांब उडी, गोळाफेक थाळी आणि भाला फेक यांच्या स्पर्धा त्याच मैदानावर दुसऱ्या बाजूस चालू होत्या. कोणत्या खेळाडूने किती नियमबद्धपणे उडी मारली वा गोळा फेकला आणि कोणता उच्चांक केला याची फारशी फिकीर नव्हतीच. मोकळ्या वातावरणातला निकोप स्पर्धेचा आणि खेळाचा आनंद मनमुराद मिळविण्यासाठी सारी धडपड चालली होती. यानंतर झाली मल्लखांब आणि लेझमीची प्रात्यक्षिके. पाच वर्षाच्या मुलापासून ते पंचवीस वर्षे वयाच्या मुलांपर्यंत साऱ्यांनी आपले कौशल्य सादर केले. योजनाबद्ध प्रयत्नाने क्रमाक्रमाने विकसित होत जाणाऱ्या क्रीडाकौशल्याचा तो एक सुंदर आलेख होता. जळते पलिते बांधून केलेली लेझीम हा तर अस्सल सातारी प्रकार होता, मराठमोळा आणि रांगडा. यानंतर झाली प्रात्यक्षिके. साऱ्या खेळाडूंना मार्गदर्शनासाठी उत्कृष्ट अशा निवडक खेळाडूंचा कबड्डी खोखोचा एकेक सामना झाला आणि त्यानंतर पळणे, उडी मारणे आणि इतर वैयक्तिक खेळातील तज्ञ खेळाडूंनी प्रात्यक्षिकासह त्यातील रहस्ये उकलून दाखविली. स्टार्ट कसा घ्यावा, स्टेपिंग कसे टाकावे कोणत्या गोष्टी

## निबंध–स्पर्धा

जयजवान युवक श्रोतृमंडळातर्फे एक निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आलेली असून स्पर्धेकरिता विषय आहे, "आजचे चित्रपट" स्पर्धेत कुणाही युवकास भाग घेता येईल. स्पर्धेकरिता प्रवेश शुल्क दीड रुपया ठेवले असून प्रत्येक स्पर्धकास अडीच रुपये किमतीचा एक कथासंग्रह भेट म्हणून देण्यात येईल. त्याकरिता स्पर्धकाने पन्नास पैशाचे पोस्टेज पाठविणे आवश्यक आहे. पहिल्या तीन क्रमाकांना रु. ५, ३, २ अशी बक्षिसे देण्यात येतील.

निबंध जास्तीत जास्त पाचशे शब्दात असावा. स्पर्धेत भाग घेण्याची अखेरची तारीख २६ जानेवारी १९७१ आहे. निबंध व प्रवेश शुल्क पाठविण्याचा पत्ता असा -- जयजवान युवक श्रोतृमंडळ, द्वारा श्री. सि. म. पारखी, ३४७ नारायण पेठ, पुणे ३०.

**सि. म. पारखी**
चिटणीस

पाळाव्या आणि कोणत्या टाळाव्या याबद्दलचे त्यांचे स्वानुभव आणि शिक्षणातून मिळविलेले ज्ञान आणि होतकरु खेळाडूंना घडविलेले त्याचे दर्शन हे सारे खूपच उपयुक्त वाटले. त्यानंतर कलेक्टरांचे भाषण वगैरे औपचारिक भाग पार पडला.

मला कौतुक वाटले ते संयोजकाच्या समर्थपणाचे. सुमारे हजार खेळाडू क्रीडांगणावर वावरत असूनही गडबळ गोंधळ जवळ जवळ दिसलीच नाही. उत्साह भरपूर होता पण बेजबाबदारपणा वा बेशिस्त आढळली नाही. कारण सरळ आहे. ते सर्व खेळाडू दररोज क्रीडांगण आणि शिस्तिला सरावलेले होते. यापेक्षाही मोठे क्रीडा-महोत्सव मी बघितले आहेत. सरकारने वा सस्थेने आयोजित केलेले पण इतरांच्या-साठी ! खेळाचा दर्जा सुधारण्यास त्यामुळे मदत निःसंशयपणे होते पण तरुण मनाच्या स्वतः खेळण्याच्या हौसेला वाव देण्यासाठी निवडक संघाच्या भरवलेल्या या सामन्याचा उपयोग कितीसा होणार !

म्हणूनच एका वैयक्तिक संस्थेने स्वतःच्याच खेळाडूंचा भरविलेला हा महोत्सव मी दुहेरी अर्थाने महत्त्वाचा मानतो. चांगले खेळाडू मिळविण्यासाठी आणि त्यांना मार्गदर्शन देण्यासाठी तर त्याचा उपयोग होईलच पण आजच्या बिघडलेल्या पिढीला संध्याकाळी नुसते इकडे तिकडे बघत रस्त्यावरून फिरायला पाहिजे असते या आरोपात काय तथ्य आहे ? योग्य प्रयत्न केले तर अल्पमोली बहुगुणी खेळात खूप मोठ्या संख्येने आजचे तरुण-मन नियमितपणे गुंतवता येते हेच या महोत्सवाने सिद्ध केले नाही का ?

## महाराष्ट्र खोखो संघाचा कर्णधार

" बी. ए. ला मी अर्थशास्त्र विषयात पहिल्या वर्गात पहिला आलो. त्याचे सुवर्ण-पदक आणि गोपाळ कृष्ण गोखले पारितोषिक मला मिळाले."

---

## मक्तेदारी संपली पण खेळाचा प्रसार ?

काही वर्षापूर्वी कबड्डीच्या महाराष्ट्र राज्याच्या संघात बारापैकी आठ-नऊ खेळाडू मुंबईचे असावयाचे. पुणे, सोलापूर, सांगलीने आपला दर्जा सुधारून ही संख्या मागीलवर्षी चारपर्यंत खाली आणली. तरीही सर्वात अधिक खेळाडू मात्र मुंबईचेच असतात. खोखोमध्ये मात्र मामला साफ उलटला. १९६३ साली मुंबई जिल्ह्याचे दहा खेळाडू होते आणि पुण्याचा केवळ एक. तर यावर्षी सर्वच्या सर्व खेळाडू आहेत पुण्याचेच. ही प्रगती निश्चितच कौतुकास्पद. पण मुंबईची अशी पीछेहाट व्हावी आणि इतर जिल्ह्यात तर फारशी हालचाल नसावीच हे खेळाचा दर्जा आणि प्रसार या दृष्टीने चिंतनीय नाही काय ?

---

दोस्तानो–क्रीडांगण सदरासाठी स्कॉलरची मुलाखत घेण्याची ही गफलत नव्हे. अभ्यासात सतत पहिला राहणाऱ्या पंचवीस वर्षाच्या सुनिल तांबेने खोखोच्या खेळातही आपला प्रथम दर्जा सतत टिकवला आहे.

सुमारे दहा वर्षापूर्वी नू. म. वि. शाळेत त्याने आपल्या खेळाचा श्रीगणेशा शंकरराव पाटणकरांच्या हाताखाली गिरवला. लंगडी आणि आट्यापाट्या या खेळातील कौशल्याचा खोखोमध्ये खूपच फायदा त्याला झाला. किंबहुना त्याच्या-मते हे खेळ पूर्वतयारी म्हणून आवश्यकच आहेत. सशाच्या पाठीमागे लागलेल्या चित्त्याच्या प्रमाणे तडाखेबंद पद्धतीने खेळाडूचा वेगवान पाठलाग करून त्याला टिपणे आणि चौकाच्यामधील खेळ करून समोरच्या संघाला दमविणे आणि नाउ-मेद करणे ही त्याच्या खेळाची खास वैशिष्टये. मात्र पायात सूर मारून गडी मारण्याचे कौशल्य शिकण्याचे राहून गेले हे मनमोकळेपणे मान्य करून त्याबाबतची रूखरूखही तो व्यक्त करतो.

हेवा वाटावा अशी त्याची क्रीडाक्षेत्रील कामगिरी आहे. स. प. कॉलेज, पुणे जिल्हा, पुणे विद्यापीठ, नवमहाराष्ट्र संघ आणि आता महाराष्ट्र राज्य या सर्व संघाचे कप्तानपद त्याने भूषविले आहे. आणि त्या त्या वेळी तो संघ अजिंक्य ठरला आहे. आतापर्यंतच्या अनेक स्पर्धातील विजयात त्याचा सिंहाचा वाटा आहे. बडोद्याला झालेल्या पुणे आणि बडोदा विद्यापीठातील अकरा डावाच्या न भूतो न भविष्यति सामन्यात पुणे विद्यापीठाचा झालेला विजय आणि इतर असे अनेक सामने त्याच्या कर्तृत्वाची साक्ष पटवतील.

वर्षभर नियमितपणे सराव तो आवश्यकच मानतो. गेल्या दहा वर्षातील क्रीडाकार-कीर्दीत परीक्षेच्या दिवशीही त्याने कधी संध्याकाळचे मैदानाचे दर्शन चुकविलेले नाही.

यंदाचा महाराष्ट्र राज्यसंघ हरियानामध्ये होणाऱ्या (२५ डिसेंबर ते २ जाने.) अ. भा. खोखो स्पर्धेत निश्चित विजयी होईल असा त्याला विश्वास वाटतो. खेळाडूंना झालेल्या दुखापती आणि कमी पडलेली पळती ही मागच्या वर्षीच्या अपयशाची कारणे यंदा निश्चितच टाळण्यात येतील.

या चतुरस्र सुविद्य आणि सूज्ञ खेळाडूच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राची मान उंच व्हावी हीच इच्छा ! □ □ □

---

दूरचे तारे
लेखक : श्रीकांत आंबेकर
लेखांक सा
जागेअभावी पुढील अंकी

---

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

२ ते ८ जानेवारी १९७१

# अंदाज

**मेष** : शरीर प्रकृती चांगली राहील. स्वभावात थोडासा तिरसटपणा वाढेल. धनस्थिती चांगलीच सुधारेल. भागीदारांशी मतभेद होईल. शनिवारी घरातील वडील भावंडांशी कलह होईल. सरकारी कामाकरिता प्रवासयोग आहे. मातुल घराण्याकडून अगर सासऱ्याकडून प्रोत्साहन मिळेल. रविवार-सोमवारी सार्वजनिक कामात भाग घ्यावा लागेल.

विद्याभ्यासात यश मिळेल. तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांना दिवस फारच चांगले आहेत. मंगळवार-बुधवारी प्रवासयोग आहे. इंडिकेटची राशी आहे. सार्वजनिक कामात यश येईल. संततीकडून त्रास होईल.

चंद्राचे भ्रमण ११।१२१।२ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. गुरुवार-शुक्रवारी अचानक धनलाभ होईल. येणारे पैसे वसूल होतील. शुभ तारखा २।३।७८.

**वृषभ** : शरीर प्रकृती चांगली राहील. धनस्थिती सुधारेल. अनेक अनपेक्षित खर्च भागण्यापुरती आवक वाढेल. सरकारकडून येणारी रक्कम हातात पडेल. गुरुवार-शुक्रवारी हा योग येईल. घरात थोडासा मतभेद होण्याचा योग शनिवारी आहे. रविवारी जवळचा प्रवासयोग आहे. दिवस आनंदात जाईल.

विद्याभ्यासात अपयश येईल. सरकारकडून अनुदान मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना जास्त त्रासदायक दिवस आहेत. बौद्धिक व्यवसाय करणारे लेखक, साहित्यिक प्रकाशक यांना थोडीशी माघार घ्यावी लागेल. सरकारी कायद्याच्या अडचणी येतील.

चंद्राचे भ्रमण १९।११।१२।१ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. शनिवारी काहीतरी शुभकार्य होईल. मंगळवार, बुधवार थोडेसे त्रासदायक जातील. शुभ तारखा ३।४।७।८.

**मिथुन** : शरीर प्रकृती व गृहस्वास्थ्य उत्तम राहील. धनस्थितीत शनिवारी थोडेसे मनाविरुद्ध घडेल. रविवार, सोमवार घरात काहीतरी शुभसमारंभ घडून येईल. चुलत घराण्यातील माणसे व इतर नातलग जमतील व दिवस आनंदात जातील. मंगळवारी-बुधवारी प्रवासयोग येईल. तसदी पडेल. शक्य तर प्रवास टाळावा.

विद्याभ्यासात यशःप्राप्ती होईल. मेडिकल, स्थापत्य, अगर शेतकीच्या शिक्षणात विशेष प्रगती घडण्याचा जोरदार योग आहे. संतती चांगली वागेल. संततीचा

उत्कर्ष होईल ३२ ते २६ वयातील व्यक्तींना संशोधनाच्या कामात यश प्राप्त होईल. सार्वजनिक कामात पत वाढेल. मानमान्यता प्राप्त होईल. थोडासा अपचनाचा विकार होईल.

चंद्राचे भ्रमण ९।१०।११।१२ या घरातून होत आहे. ते चांगले आहे. शुभ तारखा ३।४।७।८.

**कर्क :** शनिवारी शारीरिक व मानसिक त्रास फार होईल. पैशाची अडचण भासेल. पराक्रमाला दिवस चांगले आहेत. सरकारी कामात यशःप्राप्ती होईल. मातुल घराण्याकडून मदत होईल. घरात मंगळवार-बुधवारी अचानक लग्नाच्या वाटाघाटी होतील. विवाहाची मागणी येईल.

विद्येत भरघोस यश प्राप्त होईल. गुरूवार, शुक्रवार या दृष्टीने फारच चांगले जातील. संततीचा उत्कर्ष होईल. मिलिटरीत नोकरी असलेल्यांना बढती मिळेल. कंत्राटदार जमिनीचा व्यवहार करणारांचा व्यापार चांगला चालेल. मंगळवार-बुधवार या दृष्टीने चांगले जातील.

चंद्राचे भ्रमण ८।११।२०।११ या स्थानातून आहे. ते साधारणच आहे. शुक्रवारी अचानक धनलाभ होईल. शुभ तारखा ३।४।७।८.

**सिंह :** शरीर प्रकृती चांगलीच राहील. आध्यात्मिक विचार मनात येतील. धनस्थिती चांगलीच सुधारेल. नवीन घरासंबंधी सौदे पुरे होतील. शुक्रवारी घरात शुभकार्य होईल. दिवस आनंदात जाईल. सरकारी कामात यशःप्राप्ती होईल.

विद्याभासात यशःप्राप्ती होईल. संशोधनकार्य करणारांचा उत्साह वाढेल. पाठीवरच्या भावंडांना थोडा त्रास होईल. प्रवासयोग येईल. मंगळवार, बुधवार प्रवासाला उत्तम आहे. बौद्धिक व्यवसायातील व्यक्तींना प्रगतीपथावर नेणारा सप्ताह आहे,

चंद्राचे भ्रमण ७।८।९।१० या स्थानातून आहे. ते चांगलेच आहे. शुभ तारखा ४।५।६।७।८.

**कन्या :** शरीरस्वास्थ चांगले असेल. कन्या राशी साधारणतः शारीरिक दृष्ट्या दुर्बल असते. पराक्रमाने पैसा मिळेल. भावंडे मदतीला धावून येतील. भागीदारांकडून सर्व प्रकारची मदत होईल. प्रवासयोग आहे. शुक्रवारी शुभकार्याकरिता प्रवास होईल.

चंद्राचे भ्रमण ६।७।८।९ या स्थानातून आहे. ते चांगलेच आहे. मंगळवार-बुधवारी जरा मानसिक त्रास होण्याचा दाट संभव आहे. कोणाशी वादविवाद करू नये. शुभ तारखा ३।४।७।८.

**तूळ :** शरीर प्रकृती चांगली राहील. अचानक धनलाभ होऊन पैशाच्या सर्व

अडचणी दूर होतील. थोडासा राग अनावर होईल. त्याला आळा घालावा. सरकारी नोकरांना प्रमोशन मिळेल. प्रवसयोग आहे. भावंडांकडून सर्व प्रकारची मदत मिळेल. पत्नी सहाय देईल.

विद्याभ्यासात यश मिळेल. रासायनिक संशोधनात कार्य करणारांना नवीन शोध लागण्याचा दाट संभव आहे. मंगळवार, बुधवार उद्योग-धंद्यात थोडीशी माघार घ्यावी लागेल. विशेषत: वाहतुकीचा व्यवसाय करणारांना त्रास होईल बौद्धिक व्यवसाय करणारांना दिवस प्रगतीपर जातील.

**वृश्चिक :** प्रकृती बिघडण्याचा योग आहे. उष्णवाताचे विकार होतील. शनिवार मानसिक व शारीरिकदृष्टचा वाईट जाईल. अचानक धनलाभ होऊन धनस्थिती चांगलीच सुधारेल. सरकारी कामात संपूर्ण यश मिळेल. पाठच्या भावंडांकडून सुखनाश करण्याजोगी वागणूक होईल.

विद्याभ्यासात संपूर्ण प्रगती होईल. तत्त्वज्ञान व साहित्य अशा दोन्ही ज्ञानशाखात प्रगती होईल. मेडिकल व्यवसायातील लोकांना सरकारमान्यता मिळेल. भागीदार व पत्नीकडून संपूर्ण सहकार्य मिळेल. सरकारी नोकरांना दिवस चांगले आहेत. संततीचा भाग्योदय होईल.

चंद्राचे भ्रमण ४।५।६।७।८ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. शनिवारी मानसिक त्रास व गृहस्वास्थ्य बिघडेल. शुभ तारखा ३।४।५।६।७।८.

**धन :** प्रकृती चांगली राहील. धनस्थितीत सुधारणा होईल. गुरु-शुक्र व्ययात गेल्यामुळे सुखात व्यत्यय येईल. मित्र चांगले वागणार नाहीत. शनिवारी पाठीवरच्या भावंडाकडून मनस्वास्थ्य बिघडवणाऱ्या घटना घडतील. रविवार-सोमवारी विवाहाबद्दल बोलणी होण्याचा जोरदार योग आहे. घरात आनंदी वातावरण राहील.

विद्याभ्यासात अपयश येईल. एककल्लीपणामुळे नुकसान होईल. बौद्धिक व्यवसायातील व्यक्तींना समाधानकारक वातावरणात प्रगती करता येईल. मानमान्यता मिळेल. सरकारी कामात संपूर्ण यश मिळेल. प्रवासयोग आहे. मंगळवार-बुधवारी हा योग येईल. उद्योगधंद्यात वाढ होणाऱ्या घटना प्रवासात घडतील.

चंद्राचे भ्रमण ३।४।५।६ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. शनिवारखेरीज सर्व सप्ताह शुभ आहे.

**मकर :** शरीर प्रकृती ठणठणीत राहील. धनस्थिती पूर्ण बिघडेल. वाचाशुद्धी नाहीशी होईल. भाषेत कठोरपणा येईल. भावंडांकडून सर्व प्रकारची मदत होईल. मंगळवार, बुधवार घरात काहीतरी शुभसमारंभ होईल. विवाहाची बोलणी होतील. धार्मिक वृत्ती कमी होईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यश प्राप्त होईल. कारकाधिपती योग एकादशात होत आहे. मित्रांकडून मोठ-कौतुक केले जाईल. शृंगार साहित्याचे व्यवसायीकांना अमाप पैसा मिळण्याचा योग आहे. प्रेम-प्रकरणे वाढण्याचा योग आहे. २७ ते ३२ वयाच्या व्यक्तीत ही जास्त दिसून येईल.

चंद्राचे भ्रमण २।३।४।५ या स्थानातून होत आहे. ते चांगले आहे. शुक्रवार शुभ घटना घडविणारा आहे. शुभ तारखा ३।४।७।८.

**कुंभ** : शरीर प्रकृती साधारण राहील. शनिवारी मानसिक त्रास होईल. रविवार-सोमवारी अचनाक धनलाभ होईल. मागील बाकी वसूल होईल. प्रवास-योग आहे. त्यात भाग्योदय होणाऱ्या घटना घडतील.

विद्याभ्यासात यशःप्राप्ती होईल. ९।१०।११ चे अधिपती अन्योन्य योगात आहेत. एकाद्या नवीन व्यवसायात स्थिरता प्राप्त होईल. पैसा चोहोकडून मिळेल. पत वाढेल. सरकारकडून मदत होईल. व्यवसायात खूपच प्रगती होईल. आता-पर्यंत भोगलेल्या कष्टाचे फल चाखावयाला मिळेल. गुणांचे कौतुक केले जाईल. सार्वजनिक कामात मोठेपणा मिळेल.

चंद्राचे भ्रमण १।२।३।४ या घरातून आहे. ते चांगले आहे. सर्व आठवडा शुभफलदायी आहे.

**मीन** : शरीर प्रकृती चांगलीच राहील. धनस्थितीत गरम-नरम परिस्थिती राहील. आवक-जावक सारखी होत राहील. शनिवारी मानसिक यातना फार होतील. घरात काहीतरी शुभसमारंभ होईल. भावंडांकडून सर्वप्रकारची मदत होईल. अचानक धनलाभात अडथळा येईल.

विद्याभ्यासात यश येईल. संततीचा उत्कर्ष होईल. प्रवासात प्रगती वाढविणाऱ्या घटना होतील. सरकारी कामात यश मिळेल. भागीदार व पत्नी सर्व बाबतीत मदतीला धावून येतील. बौद्धिक व्यवसायातील व्यक्तींना त्यांच्या उद्योगात प्रगती करण्याला दिवस चांगले आहेत. मीन राशीच्या माणसांना आपल्यापेक्षा दुसऱ्यांच्या कामाची चिंता जास्त असते.

चंद्राचे भ्रमण १२।१२।३ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. शनिवारखेरीज सर्व सप्ताह शुभ आहे.

□ □ □

पृष्ठ ७ वरून

नाकर्तेपणा होय. नेहरूंनी या देशावर वीस वर्षे राज्य केले. परंतु एकही प्रश्न सोडवला नाही. त्यांची लोकप्रियता इतकी उदंड होती की राष्ट्रभाषेच्या किंवा प्रांताप्रांतातील सीमांचा प्रश्न त्यांनी चुटकीसरशी सोडवला असता. पण त्यांना ते जमले नाही. तेवढ्याच काळात माओच्या आधिपत्याखाली चीनची आश्चर्यकारक प्रगती झाली. स्टॅलिननेही तेवढ्याच अवधीत सोव्हिएट रशियाचा दरारा जगभर बसवला. पण नेहरु कर्तृत्वशून्य ठरले. ज्या पेपरमध्ये माओने शंभर मार्क मिळविले त्यात नेहरू पासही झाले नाहीत.

निवडणुकीच्या निमित्ताने हे सगळे रामायण माझ्या डोळ्यापुढे उभे राहिले. निवडून येणाऱ्या पक्षाने माझ्या दृष्टीने नक्की काय करायला पाहिजे याची मी एक जंत्री तयार केली आहे. ती येणेप्रमाणे–

१. दुसऱ्या देशातील राजकारणावर मत देऊ नये. यूनोचे नाममात्र सभासद असावे. भाषणबाजी थांबवावी.

२. मुसलमानांना धमकावूनदेखील या देशाच्या परंपरेशी समरस व्हायला लावावे. हिंदू-मुसलमानांना समान कायदा असावा. वाद्यबंदीसारखी खुळे कठोरपणाने मोडून काढावी.

३. जमिनीची मर्यादा ठरवावी आणि ती खरोखरच अमलात आणावी.

४. छोटे छोटे उद्योगधंदे सर्व देशभर विखुरलेले जावेत.

५. अद्यावत हत्यारांनी सेना सज्ज असावी. अणुबाँब निर्माण करावा. हैड्रोजन बाँबही करावा. त्यांचा शक्यतो विकासाकरता उपयोग करावा.

६. देशातील बहुतेक सर्व सरकारी अधिकारी लाचखाऊ आणि दिरंगाईखोर आहेत. पैसे मोजल्याशिवाय हल्ली काम होत नाही. त्यांना वचक बसवावा.

७. पोलीस दल जास्त कार्यक्षम करावे. पोलिसांचे पगार वाढवावेत. कसल्याही तऱ्हेची यादवी मुळीच गय न करता ठेचून काढावी.

८. शिक्षण सार्वत्रिक तर असावेच, पण कार्यक्षम शिक्षकांच्या हाती सोपवलेले असावे.

९. खेडोपाडींच्या गुंडांचा आणि शहरातल्या दादांचा बंदोबस्त करून नागरी जीवन निर्भय करावे.

अशा आणखी काही गोष्टी सांगता येतील परंतु त्या अमलात आणण्यासाठी जी निष्ठा आणि कार्यक्षमता लागते तिचा आज अभाव आहे. समाजवाद हे नुसते बुजगावणे झाले आहे. तो शब्द कायद्याने बंद करावा. अमेरिका समाजवादी नाही. परंतु कार्यक्षम व्यवस्थेमुळे तो देश आपल्यापेक्षा सहस्र पटीनी सुखी आहे. समाज-

वाद असो नसो; सामान्य माणसाच्या जीवनात सुख अवतरले पाहिजे.

सामान्य लोकांशी बोलताना एक प्रश्न नेहमी विचारला जातो. या देशाचं भलं लोकशाहीने खरोखरच होईल का ?.. का कोठल्यातरी अपसमजावर आपण लोकशाहीचा स्वीकार केलेला आहे ? निवडणुकीचा एवढा गोंधळ घालून लायक माणसे आपण निवडून देतो का ? त्यापेक्षा स्टॅलिनसारखा किंवा माओसारखा एखादा कार्यक्षम हुकूमशहा निर्माण झाला व त्याने सर्व प्रश्न सोडवले आणि काही दिवस वावदूकपणा आणि घोषणाबाजी बंद करून हा देश प्रगतीकडे खेचत नेला तर काय बिघडले ? या प्रश्नाला मजजवळ उत्तर नाही. परंतु तो प्रश्न तितकासा निरर्थकही नाही. भारतातील मतदार अजूनही सूज्ञ न झाल्याकारणाने लायक उमेदवार निवडून येणे कठीण आहे.

वर सांगितलेले विचार अमलात आणील असा पक्ष कोणता ? मी कोणाला मत द्यावे ? इतके रामायण झाल्यावर पुन्हा रामाची सीता कोण हे उरतेच. निरनिराळे पक्ष जे जाहीरनामे काढतील, त्यात हे सारे प्रश्न सोडवण्याचे आश्वासन असेल. पण जाहीरनाम्यावर भारतातल्या एका तरी माणसाचा विश्वास उरला आहे का ?

मी कोणाला मत द्यावे हे अनिर्णितच आहे. नवी जुनी काँग्रेस हे प्रश्न सोडविण्यास असमर्थ आहेत. त्यांना भाषणबाजीचा रोग झाला आहे. सं. सो. पा. आणि प्र. सो. पा. यांच्याबद्दल म्या पामरे काय बोलावे ? इतकी वर्षे पेपर वाचूनही सं. सो. पा. म्हणजे काय आणि प्र. सो. पा. म्हणजे काय ? एस. एम. कोणत्या पक्षाचे आणि नानासाहेब गोरे कोणत्या पक्षाचे हे मला सांगता येणार नाही. शेवटी राहिला जनसंघ ! मी त्याचा पहिल्यापासून थोडा फार विरोधकच आहे. परंतु तो खरोखरच तितका प्रतिगामी आहे का ? इतके दिवस पुरोगाम्यांना मते दिली तरी देशाची स्थिती जास्तच बिकट होत गेली. आता मी काय करू ?

खरे तर असल्या विषयावर विचार प्रगट करणे माझ्यासारख्या सामान्य माणसाचे काम नव्हे. परंतु यावेळी कोणत्याही माणसाने गप्प बसून चालणार नाही. निवडणुकीचा संग्राम सुरू झाला आहे. स्वतःचे विचार त्याने बोलून दाखवले पाहिजेत. लिहिले पाहिजेत. कितीही सामान्य माणूस असला तरी त्याने यावेळी जागे झाले पाहिजे.

'माणूस'च्या माध्यमातून मी हे माझे सामान्य माणसाचे विचार प्रगट करीत आहे.

□ □ □

**राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर**

# छोटी दिनदर्शिका १९७१

| महिने | जानेवारी ऑक्टोबर | मे | ऑगस्ट | फेब्रुवारी मार्च नोव्हेंबर | जून | सप्टेंबर डिसेंबर | एप्रिल जुलै | दिनांक | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | १ | ८ | १५ | २२ | २९ |
| | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | २ | ९ | १६ | २३ | ३० |
| | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | ३ | १० | १७ | २४ | ३१ |
| वार | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | ४ | ११ | १८ | २५ | |
| | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | ५ | १२ | १९ | २६ | |
| | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | ६ | १३ | २० | २७ | |
| | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | ७ | १४ | २१ | २८ | |

सादरकर्ते : शिवशंकर सिद्रामप्पा गळुरगी (हुणचे) ३११/१२ पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर २

MANOOS ( Biweekly ) : 40 Paise : Regd. No. M-H 649